## ठाणे महानगरपालिका, ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :-१७.१२.२०१४

**मा. सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**
**सभा क्रमांक २४ दिनांक १७.१२.२०१४**
**सभा सूचना क्रमांक ०७ दनांक ११.११.२०१४**
**सभा क्रमांक ०६ दिनांक १७.१२.२०१४**

ठाणे महानगरपालिकेची मा सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २०.११.२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक ०७ दिनांक ११.११.२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती. परंतू सदरची सभा तहकूब होऊन पुन्हा खंडीत झाल्याने सदरची सभा दि.२८.११.२०१४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदरची खंडीत सभा पुन्हा तहकूब झाल्याने सदरची तहकूब सभा गुरुवार दि.०४.१२.२०१४ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदरची खंडीत सभा पुन्हा तहकूब झाल्याने सदरची तहकूब सभा गुरुवार दि.११.१२.२०१४ रोजी दुपारी ठिक १.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा पुन्हा खंडीत झाल्याने सदर सभा बुधवार दि.१७.१२.२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. संजय भाऊराव मोरे हे उपस्थित होते.

सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे .

**१) श्री. संजय भाऊराव मोरे - महापौर**
**२) श्री. राजेंद्र रमेश साप्ते - उप महापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | आरज प्रगती भारत | ४ | नरेश रतन मणेरा |
| ५ | मढवी बिंदू महेंद्र | ६ | डुंबरे मनोहर जयसिंग |
| ७ | मुकेश मधुकर मोकाशी | ८ | मधुकर रामचंद्र पावशे |
| ९ | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | १० | भोईर संजय देवराम |
| ११ | स्नेहा अंकुश पाटील | १२ | हरिश्चंद्र श्रीपत पाटील |
| १३ | उषा संजय भोईर | १४ | चव्हाण सुधाकर वामन |
| १५ | आशादेवी शेरबहादूर सिंह | १६ | इंदिसे रेखाबाई मिनानाथ |
| १७ | चव्हाण तेजस्विनी किरण | १८ | प्राजक्ता प्रदिप खाडे |
| १९ | वाव्हळ सुभाष सिताराम | २० | सुशिला संकटाप्रसाद यादव |
| २१ | संभाजी धोंडिराम पंडीत | २२ | राजकुमार रामनयन यादव |
| २३ | विलास चंदू कांबळे | २४ | सरैय्या अमित जयसिंग |
| २५ | सरनाईक परिषा प्रताप | २६ | जगदाळे हनुमंत ज्ञानु |
| २७ | भोईर विमल अर्जून | २८ | पालांडे दशरथ बाबुराव |
| २९ | पाटील कल्पना हरिश्चंद्र | ३० | सरनाईक विहंग प्रताप |

-महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | लासे विजया मनोज | ३२ | चव्हाण विक्रांत भिमसेन |
| ३३ | पाटील उमेश काशिनाथ | ३४ | पांडे संजय श्रीनाथ |
| ३५ | देसाई सुहास सुर्यकांत | ३६ | पाटील शारदा विजय |
| ३७ | मिलिंद माधव पाटणकर | ३८ | गौरी अनिता सुनील |
| ३९ | नंदा कृष्णा पाटील | ४० | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| ४१ | मंदार प्रमोद विचारे | ४२ | महेश्वरी संजय तरे |
| ४३ | कणसे निर्मला शरद | ४४ | नंदिनी राजन विचारे |
| ४५ | बोरीटकर प्रभा अशोक | ४६ | वडवले संतोष वसंत |
| ४७ | भोईर एकता एकनाथ | ४८ | वैती अशोक बारकू |
| ४९ | जितेंद्र प्रभाकर वाघ | ५० | तायडे रामभाऊ महादेव |
| ५१ | शिंदे मनोज तुकाराम | ५२ | आशा बाबासाहेब कांबळे |
| ५३ | काशिराम गोविंद राऊत | ५४ | शान मनप्रीत गुरमकसिंग |
| ५५ | मोरे संध्या सुनिल | ५६ | संगिता माणिक पाटील |
| ५७ | जानकर योगेश तातोबा | ५८ | घाडीगांवकर संजय पांडुरंग |
| ५९ | वेतकर दिपक विजय | ६० | खताळ विशाखा मधुकर |
| ६१ | भोसले नम्रता दिपक | ६२ | जगताप अश्विनी अशोक |
| ६३ | हिराकांत बेंडू फर्डे | ६४ | म्हस्के नरेश गणपत |
| ६५ | मोरे रुचिता राजेश | ६६ | नारायण शंकर पवार |
| ६७ | सोनार सारिका संजय | ६८ | कोकाटे सुधीर विष्णु |
| ६९ | महेश सुरेश वाघ | ७० | वाघ पुजा गणेश |
| ७१ | नजीब सुलेमान मुल्ला | ७२ | वहिदा मुस्तफा खान |
| ७३ | साळवी अपर्णा मिलींद | ७४ | मनिषा महेश साळवी |
| ७५ | महेश जगन्नाथ साळवी | ७६ | पाटील मिलींद भारत |
| ७७ | पाटील मनाली मिलींद | ७८ | केणी मुकूंद बाळू |
| ७९ | केणी प्रमिला मुकूंद | ८० | महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट |
| ८१ | हंडोरे मेघना सुनिल | ८२ | सामंत विलास शिवराम |
| ८३ | लोखंडे सुहासिनी सुनिल | ८४ | संजय संतू वाघुले |
| ८५ | पाटील मालती रमाकांत | ८६ | भरत अभिमन्यु चव्हाण |
| ८७ | नाईक राजश्री सुनिल | ८८ | राजे गिरीश अनंत |

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

| | | | |
|---|---|---|---|
| ८९ | ठाकूर अक्षय अनंत | ९० | पाटील अवंतिका शशिकांत |
| ८१ | कळंबे मंगल चंद्रकांत | ९२ | यादव रिटा राजनाथ |
| ९३ | कुरेशी साजिया आई | ९४ | काकडे बालाजी दगडू |
| ९५ | असिया यासिन कुरेशी | ९६ | कुरेशी यासीन अय्युब |
| ९७ | किणे राजन नारायण | ९८ | विश्वनाथ भगत |
| ९९ | मिर्झा जमेला तबस्सूम इनायत बेग | १०० | भगत सुधीर रामचंद्र |
| १०१ | आशरीन इब्राहीम राऊत | १०२ | पाटील रेश्मा रमेश |
| १०३ | पाटील शैलेश मनोहर | १०४ | हफिजा नसीरुद्दीन नाईक |
| १०५ | खान मिराज नईम | १०६ | डोंगरे सिराज महम्मद अली |
| **१०७** | हिरा सिताराम पाटील | | |

गैरहजर सदस्य खालीलप्रमाणे:

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उज्वला रामचंद्र फडतरे | २. | पुर्णेकर जयनाथ यशवंत |
| ३. | राधा फत्तेबहादूर सिंह | ४. | पाटील वर्षा वसंत |
| ५. | डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर | ६. | एगडे रामचंद्र हरी |
| ७. | संखे मिनल मुकूंद | ८. | पाटील सुजाता भास्कर |
| ९. | साळवी मनोहर रामा | १०. | अनिता अरुण बिर्जे |
| ११. | रेखा भालचंद्र पाटील | १२. | टिकमानी लक्ष्मण (लच्छू) |
| १३. | राजेश भालचंद्र गवारी | १४. | गोटे सिंधू कुंदन |
| १५. | पठाण अशरफ उस्तान | १६. | अन्सारी साजिया परवीन सरफराज |
| १७. | मुंडे सुनिता गणेश | | |

रजा सदस्य खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १. | जाधवर राधाबाई सुभाष |

महापौर
महानगरपालिका ठाणे

छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अपर्ण करुन सभेस सुरुवात होते.

मा.सचिव : मागच्या सभेमध्ये प्रकरण क्रमांक ७४ मंजूर करण्यांत आलेले आहे.

श्री.हरिश्चंद्र पाटील :

महापौर महोदय, माझी विरोधी पक्षनेते यांना विनंती आहे की,आज आपण अजेंडा पुर्ण करुया व त्यानंतर लक्षवेधीवर चर्चा करुया. लक्षवेधीवर चर्चा करण्यासाठी सभागृहात आयुक्त महोदय असणे आवश्यक आहे तरी आता आपण अजेंडा पुर्ण करावा.

श्री.मिलिंद पाटणकर :

महापौर महोदय, गंभीर विषयावर दोन दिवसापुर्वी चर्चा सुरु केली होती आणि आज खेळीमेळीच्या वातावरणात आज आपण गंभीर विषयावर चर्चा करणार आहोत. हे पाहुन सन्मा.सुधीर भगत मगाशी म्हणाले की चांगले वातावरण निर्माण झाले हे पाहुन बरे वाटले. कारण एकीकडे शिंदे साहेब तर दुसरीकडे घाडीगांवकर आणि मग त्यांना शह द्यायला पालांडे साहेब, वैती साहेब. तरी हा जो गंभीर विषय आहे त्यावर प्रशासन गंभीरपणे विचार करेल अशी स्थिती निर्माण होऊ शकते. महापालिकेची आर्थिक अवस्था यावर आपण बोलायला सुरुवात केली होतीआणि त्यातुन अनेक विषय बाहेर आले. आयुक्तांनी त्यांच्या निवेदनात सांगितले होते कीएलबीटी बरोबर आहे, आपला मालमत्ता करसुध्दा बरोबर आहे.पाण्याची आकारसुध्दा आपण बरोबर वसुली करीत आहोत. शहरविकास विभाग म्हणते की प्रस्तावच येत नाही तर वसुली कुठे होणार, मग अशीही चर्चा झाली की, स्थायी समितीने सभागृह नेते यांच्या नेतृत्वाखाली ते बजेट वाढवले आणि साडेपाचशे कोटी रुपये वाढवुन स्थायी समितीने बजेट पुढे आणले मग महासभेने आणखी त्यात भर घातली व त्यामुळे उत्पन्नात कारण नसताना भर पडल्यामुळे बजेट फुगवण्यात गेले आणि त्याचा आता हा परिणाम असा दिसतो की, जे एस्टीमेटेड उत्पन्न आहे त्याच्यापेक्षा उत्पन्न खूप कमी आहे की काय असा सर्वदूरसमज झाला आहे. मला माहित नाही की समज होणे आणि प्रत्यक्षात फरक असता तर तो फरक लोकांना,नगरसेवकांना सर्वांना जाणवला असता. चार दिवसापुर्वी अशीसुध्दा चर्चा झाली होती की, ठेकेदारांच्या तब्येतीवर परिणाम होत आहे,कांही ठेकेदारांना हार्टॲटॅक होत आहे. तर अशी परिस्थिती का येत आहे तर निश्चितपणे प्रशासनाच्य निवेदनात जी तफावत आणि प्रत्यक्ष आर्थिक स्थितीत जी तफावत आहे त्यामुळे हे सगळे घडत आहे. मागच्यावेळी सभागृहात अशीसुध्दा चर्चा होती की, प्रभाग सुधारणा निधी अदयाप दिला गेलेलाच नाही. तसेच त्याच्या निविदा काढु नये अशी चर्चा होती. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की प्रशासन जर हे म्हणत असेल की,एलबीटीची वसुली व्यवस्थित आहे,सगळी वसुली व्यवस्थित आहे, तर मग अशी अवस्था कां निर्माण झाली? ज्यांनी ही लक्षवेधी मांडली त्यांनी हे प्रश्न वारंवार विचारले की, आम्ही जे उत्पन्नाचे साधन वाढविण्याचे प्रशासनाला सांगितले होते त्याचे कांय झाले, आत्ताचे जे वाढलेले उत्पन्न आहे ते खरोखरच अपेक्षेप्रमाणे आहे किंवा नाही, परंतू याबाबतचे उत्तर प्रशासन आज या सभागृहात देऊ शकले नाही. आणि जे कांही उत्तर दिले आहे त्याने सदस्याचे समाधान झालेले नाही. मग नेमकी आपली परिस्थिती कांय आहे, प्रशासन कांहीही म्हणुदे परंतू जे आकडे प्रसिध्द झाले आहेत किंवा जे आकडे माहितीच्या आधारे मिळाले आहेत ते हेच सांगतात की मालमत्ता कराची वसुली ४० टक्क्याहुन कमी आहे.पाणी खात्याची वसुली २० टक्क्याहुन कमी आहे. एलबीटीची वसुली ही जेमतेम ४५ टक्के एवढीच आहे. आणि आता उरलेत फक्त तीन महिने. तरी या तीन महिन्यात उरलेली जी ६० टक्के वसुली आहे ती जर झाली नाही तर आपल्या

-महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

महापालिकेची अवस्था कांय होईल? खर्चाचेसुध्दा आकडे मी तुम्हाला सांगतो की यामध्ये कसे झाले आहे की, प्रभागात विदयुत पोल बसविणे याबाबत आयुक्तांनी प्रस्तावित केलेला खर्च होता शुन्य,स्थायी समितीने मान्य केलेला खर्च होता शुन्य आणि प्रत्यक्षात यासाठी दोन कोटी रुपये खर्च झाले आहेत, मग हे कसेकाय होऊ शकते? मग येथे ऑडीट,कॅफो हे सगळे कांय करतात? स्वत: आयुक्त अशाप्रकारच्या प्रकरणांवर सहया कशा करतात? जर मुळात बजेट नाही तर तुम्ही बिले कशी काढतात? व त्यावर सहया कशा होतात? मुंब्रा प्रभाग समितीचे असेच उदाहरण आहे,प्रस्तावित खर्च शुन्य आहे परंतू प्रत्यक्षात चार कोटीची बिले दिली गेली आहेत. इतक्या ढिसाळपणे जर प्रशासनाचा कारभार असेल तर महापालिकेची अशी परिस्थिती निर्माण होणे हे असेच होणार आहे. आणि हेच ठाणेकर आणि नगरसेवकांना फेस करावे लागणार आहे. कारण हा ढिसाळ कारभार आहे. अधिका-यांची जर काम करण्याची इच्छा नसेल आणि नको तेथे इंटरेस्ट दाखवुन काम करत असतील तर शेवटी जी परिस्थिती निर्माण होणार आहे ती अशीच होणार आहे. तरी या सर्व गोष्टींची प्रशासनाकडून उत्तरे पाहिजेत की असे कसे होऊ शकले? जर बजेट नसताना खर्च होत असेल आणि अपेक्षित उत्पन्न झालेले नसतानासुध्दा जर प्रशासन म्हणत असेल की अपेक्षित उत्पन्न झालेले आहे आणि ते बरोबर आहे तर प्रशासन आमच्यासमोर कसे उत्तर देणार आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे आणि त्याकडे आयुक्तय आणि प्रशासनाचे लक्ष नाही असे माझा ठाम समज झालेला आहे. जेव्हा जेव्हा तुम्ही प्रशासनाकडे विषय घेऊन जाल तेव्हा तेव्हा त्यावर प्रशासन गंभीर नाही हे जाणवते. मी मध्यंतरी कांही प्रकरणाबाबत मा.आयुक्तांकडे तक्रारसुध्दा केली होती की या या विकासकांनी ज्यांनी परवानग्या दिलेल्या आहेत त्याप्रमाणे काम केलेले नाही तरी त्यांना दंड झाला पाहिजे तरी तो अजून तो दंड झालेला नाही. वसुलीतर दूरच राहीली परंतू रुस्तमजीकडून तो दंडच अदयाप कॅलक्युलेट केला गेला नाही. याबाबत मी आयुक्तांकडे जाऊन त्याच्यासंबंधी तक्रार केलेली आहे की सँशन प्लॅनप्रमाणे त्यांनी काम केलेले नाही आणि त्याच्यावर अदयापही महापालिकेच्या टीडीओ विभागाकडून ॲक्शन घेण्यात आलेली नाही. आणि मग जर टीडीओचे उत्पन्न अपेक्षेप्रमाणे झालेले नसेल तर त्याला जबाबदार कोण? मी उत्पन्न वाढविण्याबाबतच्या गोष्टी अजुनपर्यंत करतच नाही परंतू जे उत्पन्न आहे ते मिळविण्याची जर प्रशासनाची इच्छाच नसेल, फक्त आपला पगार होत आहे एवढेच बघायचे आणि तेवढे उत्पन्न दर महिन्याला आले की झाले. परिवहनबाबत जास्त बोलायला नको कारण त्यांचे उत्पन तेवढे येत नाही म्हणजे जेवढा पगार होतो तेवढेही उत्पन्न येत नाही त्यामुळे त्यांच्याविषयी कांही बोलायलाच नको. आज आपल्या कित्येक मालमत्ता अशा आहेत की ज्याकडे आपण उत्पन्नाचे साधन म्हणून बघतच नाही आणि हे वर्षानुवर्षे चाललेले आहे त्याच्याकडे कोणाचेच लक्ष नाही. अशी अवस्था जर प्रशासनाची असेल. आता येथे आयुक्त उपस्थित असते तर मी त्यांना सांगितले असते इंग्रजीमध्ये एक प्रसिध्द म्हण आहे, काम कोण करते तर प्रत्यक्ष गन कांही गोळया झाडत नाही, त्याच्यामागचा हातसुध्दा नाही तर जे मन असते ते गोळया झाडत असते. येथे जर प्रशासनाचे मनच कामात नाही तर गोळया कशा झाडल्या जाणार, उत्पन्न येणार कसे? आणि मग अपेक्षित कामेसुध्दा होणार नाहीत. म्हणून ही जी लक्षवेधी मांडली आहे ती उत्पन्न कमी आहे,आर्थिक स्थिती गंभीर आहे हा विषय आहेच परंतू या लक्षवेधीचे प्रमुख कारण आहे प्रशासनांची मानसिकता आणि प्रशासनाची काम करण्याची मानसिकता जर काम करण्याची मानसिकता नसेलतर मला वाटते यामध्ये महापौर महोदय आपल्या नेतृत्वाखाली आमुलाग्र बदल झाला पाहिजे मग त्यासाठी काहीही करावे लागले तरी चालेल आपण सगळे मिळुन राज्य शासनाकडे जाऊ त्यांना सांगु की आपले जे अधिकारी त्यातील काही प्रतिनियुक्तीवरचे असतील कांही महापालिकेचे असतील ते जर अजिबात काम करत नसतील,त्यांची जर काम करण्याची मानसिकताच नसेल तर पुढे कांय करायचे , आपल्या नगरसेवकांच्या हातात कांहीच नाही आपण फक्त लक्षवेधी मांडू शकतो. महापौर साहेब सुध्दा

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

५।

स्वत: फोन करुन अमुक एक प्रस्ताव पुढे न्या हे सांगुनसुध्दा एखादा अधिकारी पुढे जात नसेल तर मग कांय करायचे? अशावेळी महापौर महोदय मलातरी असे वाटते की, आपण हे प्रकरण अतिशय गांभिर्याने घ्यावे, ही जी चर्चा आणि ही जी कांही लक्षवेधी आहे त्यातून जर प्रशासनाची मानसिकता बदलणार नसेल तर याही लक्षवेधीचा कांहीही उपयोग होणार नाही. महापौर महोदय मी जे मगाशी आकडे सांगितले की प्रस्तावित खर्च आयुक्तांनी शुन्य दाखविलेला असताना प्रत्यक्ष बिले दिले गेली आहेत ती कशी देण्यात गेली तर ती सर्व स्पिलओव्हरची बिले होती. आणि स्पिलओव्हरचा खर्चसुध्दा प्रशासन स्वत: अर्थसंकल्पात दाखवत नसतील आणि आपल्याला स्थायी समिती आणि महासभेसमोर जर खोटाअर्थसंकल्प जर सादर करत असेल अशावेळी या सभागृहाने कांय करायचे? आणि मग कोणीय म्हटले की, सभागृहाने उत्पन्नात कारण नसताना भर घातली अर्थसंकल्प फुगवला आहे,अजिबात होऊ शकत नसताना उत्पन्नं वाढविण्यात आले आहे असे जर कोणी म्हटले तर आपण ते कसे खपवुन घ्यायचे? तरी महापौर महोदय आपण हे अजिबात खपवुन घेता कामा नये. नेमके असे झाले आहे की आपण नेमके खुर्चीवर बसलात आणि महापालिकेची आर्थिक अवस्था बिघडली असे चित्र जे उभे केले जात आहे तसे प्रत्यक्षात नाही. आर्थिक अवस्था ही अगोदरपासुनच बिघडलेली आहे. तरी आर्थिक अवस्था बिघडण्याचे जे कारण आहे ते आयुक्त आणि त्यांचे सहकारी यांच्या मानसिकतेत आहे. परवासुध्दा एलबीटीबाबत मिटींग झाली असे ऐकले, व्यापारी एलबीटी भरत नाहीत. त्यांच्यावर काय ॲक्शन घ्यायची हे अजून ठरलेले नाही. लोकं मालमत्ता कर भरत नाहीत.त्यांच्यावर कांय ॲक्शन घ्यायची माहित नाही.मालमत्ता कर कां भरत नाही याची कारणमिमांसासुध्दा प्रशासनाला माहित नाही. पाण्याची बिले कित्येकठिकाणी अदयापपर्यंत दिलीच गेली नाहीत. स्थावर मालमत्तेचा तोच प्रकार आहे. आपल्याला माहितच नाही की आपल्या किती मालमत्ता आहेत याबाबत. आपण शैक्षणिक भूखंड भाडेपट्टी कराराने दयावे जेणेकरुन महापालिकेला उत्पन्न मिळेल अशाप्रकारचा तीन वर्षापुर्वी महापालिकेने ठराव केला आहे परंतू त्याचे कांहीही झालेले नाही. एखादी गोष्ट सभागृहात ठराव होऊन त्याची अंमलबजावणी व्हायला जर चार-चार वर्ष लागत असतील आणि मग जर प्रशासन म्हणत असेल की उत्पन्न नाही तर त्याला जबाबदार कोण? अभय योजना आपण लागु केली त्यालासुध्दा चार वर्ष झाली तेव्हासुध्दा अपेक्षा होती यातुन महापालिकेला चाळीस ते पन्नास कोटी उत्पन्न मिळेल. माझ्या माहितीप्रमाणे ८ ते १० दिवसापुर्वी अभय योजनेव्दारा पहिली ओसी दिली गेली, म्हणजेच तुम्हाला काम करायचे नाही, आणि जर तुम्हाला काम करायचे नाहीतर तसे अगोदर सांगा तुम्ही शांत बसा आम्ही शांत बसु, महासभा आणि स्थायी समितीची मिटींगसुध्दा लावण्याचे काही कारण नाही. स्थायी समिती एवढे प्रश्न विचारते, महापालिकेची आर्थिक नाडी ही स्थायी समिती आहे. प्रत्येक स्थायी समितीमध्ये मोठया प्रमाणात चर्चा होते, तसेच प्रश्न विचारले जातात परंतू कशाचेच उत्तर नाही. ऑडीट रिपोर्टमध्ये कोणकोणत्या गोष्टीची वसुली कां झाली नाही त्याच्या चुका काढल्या जातात त्याच्यावर कोणत्याही प्रकारचे कॉंप्लॅस प्रशासनातर्फे केले जात नाही. ती वसुली केली जात नाही, काहीच होत नाही. आणि हे जर असेच चालणार असेल तर खरोखरच महापालिका बंद करायची वेळ येईल आणि नागरीक असं म्हणायला सुरुवात करतील की हे सर्व बंद करा, आता पुरे झाले. आपल्याला कमीतकमी जे कांही मानधन नगरसेवकांना मिळते ते मानधनतरी महापालिकेचे वाचेल कारण आपण कर्मचा-यांचे पगारतर बंद करु शकत नाही ते तर चालु ठेवायला पाहिजे. तरी आमचे समाधान करण्यासाठी याचा पाठपुरावा करुन उत्तरे दिली पाहिजे. तरच या लक्षवेधीला कांहीतरी अर्थ आहे, लक्षवेधीचा कांहीतरी परिणाम प्रशासनावर झालेला आहे असा अर्थ आपल्याला काढता येईल. आणि हा जो प्रशासनाचा बेजबाबदारपणा आहे. तरी महापौर महोदय आपण यावर गंभीरपणे ॲक्शन घ्या आणि या लक्षवेधीनंतर या सभागृहातच सांगू की पुढच्यावेळेला आम्हाला या सगळयाची उत्तरे आत्ता लक्षवेधी संपल्यावर देण्यात यावी कारण मागच्यावेळी प्रशासन याची उत्तरे देऊ शकले नाहीत. आणि आज आठवडा झाला आहे आणि

-महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

६। –

आठवडयानंतरही जर प्रशासन त्या विषयावर उत्तर देऊ शकत नसेल तर महापौर महोदय हे ॲक्सेप्टेबल नाही, ही मान्य होणारी गोष्ट नाही. प्रशासन जर अशाप्रकारे चालढकलपणा करत असेलतर मी आपल्यासकट उपमहापौर,विरोधी पक्षनेते, सभागृह नेते सर्वांना विनंती करतो की याच्यानंतर प्रशासन जर चांगल्याप्रकारे उत्तर देऊ शकले नाहीतर आपण सर्वांनी मिळुन राज्य शासनाकडे दाद मागायला जाण्याची वेळ येईल आणि ती वेळ मात्र आपण दवडता कामा नये, आपण गंभीरपणे याची दखल राज्य शासनास घेण्यास भाग पाडले पाहिजे. आपले सभागृहातील असलेले व ज्यांना ठाण्याबद्दल अतिशय कळवळा आहे असे कॅबिनेट मंत्री आहेत आणि ते आपल्याला निश्चितपणे मदत करतील, आपले बाकीचे आमदार आहेत त्यांच्या मदतीने आपण राज्य शासनाकडे जाऊन मुख्यमंत्र्यांकडे प्रशासनाविरुध्द ही दाद मागायला या लक्षवेधीचा तो परिणाम म्हणुन असेल तर तो आपण करुया असे माझे ठाम म्हणणे आहे. मला बोलण्यास संधी दिली. धन्यवाद जयहिंद.

श्री.उमेश पाटील :

महापौर महोदय,सन्मा.संजय घाडीगांवकर व सन्मा.मनोज शिंदे यांनी जी लक्षवेधी मांडली त्यावर मला बोलायचे आहे. महापौर महोदय आपण वृत्तपत्रामध्ये बातम्या वाचतो की ठाणे महापालिका डबघाईला. परंतू माझे असे म्हणणे आहे की नगरसेवकसुध्दा डबघाईला आलेले आहे. कारण आम्ही कामासंदर्भात एखादया अधिका-याकडे जातो त्यावेळी अधिकारी आम्हाला बजेट नाही म्हणुन सांगतात. आज आम्हाला जनतेने निवडुन दिलेले आहे. त्या जनतेचे एकच गा-हाणे असते त्यामध्ये रस्त्याचे प्रश्न असतील, किंवा प्रभागातील कामे झाली पाहिजेत. परंतू प्रशासनाकडुन प्रत्येकवेळी सांगण्यात येते की बजेट नाही म्हणून. आत्ताच सन्मा.पाटणकर साहेबांनी सांगितले की आपण राज्य शासनाकडे गेले पाहिजे. महापालिका डबघाईला कां आली हा प्रश्न निर्माण झाल्यानंतर प्रशासनाने विचार केला पाहिजे की, ज्यावेळी जकात बंद झाली त्यावेळी ४१९ कोटी रुपये येणे होते त्याचे कांय झाले? याबाबतसुध्दा विचार करणे गरजेचे आहे. आज शहरात अनेक हॉटेल्स,दुकाने असतील त्यांच्यावर धाडी टाकण्यात आल्या ,त्यापोटी आपल्या महापालिकेत अनेक पैसे आले,परंतू बाकीचे जे दुकाने,हॉटैल्स आहेत त्यांच्याकडुन जे येणे आहे त्याचे कांय झाले ? आपण ठाणे महापालिकेने अनेक वास्तु बांधलेल्या आहेत, त्यातील कांही मच्छी मार्केट व समाजमंदिर हे बंद अवस्थेत आहेत. तरी त्यातुनसुध्दा आपल्याला उत्पन्न मिळु शकते. परंतू हया वास्तु कां बंद आहेत याचा जाब प्रशासनाला विचारला गेला पाहिजे. महापौर महोदय ठाणे महापालिकेच्या एकुण दहा प्रभाग समित्या आहेत. या दहा प्रभाग समित्यांमध्ये अनेक इमारती तसेच चाळी आहेत त्यांना अदयाप टॅक्स लावला गेला नाही. आपण जर प्रभागवाईज याची माहिती घेतली तर त्याठिकाणी किती इमारती आहेत व आपण किती लोकांना अदयाप टॅक्स लावला नाही आणि तो लावल्यास त्यातुन आपल्याला उत्पन्न मिळु शकते. आपण जर उत्पन्न वाढीबाबत विचारच केला नाही तर उत्पन्न वाढणार नाही. महापौर महोदय, आजपर्यंत पाण्याची बिले मिळालेली नाही. तरी महापौर महोदय माझी आपणास विनंती आहे की या सर्वांचा प्रशासनाने गंभीर विचार करुन ही सर्व कामे तांतडीने करण्यात यावीत. काही दुकानदार एलबीटी भरत नाहीत. आता नाताळ सण जवळ आला आहे. ३१ डिसेंबर येईल अशावेळी सर्व दुकानदार दुकाने भरुन ठेवत आहेत. तरी अशावेळी मी असे म्हणेन की त्यांचे नाक दाबल्याशिवाय तोंड उघडणार नाही , कारण जर आपल्याला वसुली करुन उत्पन्न वाढवायचे असेल तर अशावेळी कांहीतरी कार्यवाही करणे आवश्यक आहे. मा.आयुक्त साहेब जेव्हा मुंबईला होते आपले दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृह आहे, त्याचे गाळे आपण भाडेतत्वावर दिलेले आहेत परंतू त्याचे भाडे येते का हे सुध्दा तपासुन पाहिले पाहिजे. महापौर महोदय ,आपण मला बोलण्याची संधी दिली,त्याबद्दल धन्यवाद.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

श्री.नारायण पवार :

महापौर महोदय,सन्मा.संजय घाडीगांवकर व सन्मा.मनोज शिंदे यांनी मांडलेल्या लक्षवेधीला पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे. महापौर महोदय, ठाणे महापालिका डबघाईला

आलेला असुन त्यास जबाबदार कोण अशाप्रकारची लक्षवेधी मांडण्यात आलेली आहे. आणि प्रशासन म्हणते की महापालिका डबघाईला गेलेली नाही. त्यामुळे नक्की कांय ते समजत नाही की लक्षवेधी चुकीची आहे व प्रशासन बरोबर आहे की प्रशासन चुकीचे आहे आणि लक्षवेधी बरोबर आहे. मध्यंतरी मा.आयुक्तांनी एक परिपत्रक काढले होते व त्या परिपत्रकामध्ये अधिका-यांचे व ठेकेदारांची बिले देऊ नयेत अशाप्रकरचे परिपत्रक काढण्यात आले होते. आज जर कॅफोंकडे गेल्यावर जर विचारले की परिस्थिती कांय आहे तर सांगितले जाते की फार बिकट परिस्थिती आहे. व त्यावेळी त्यांनी मला ठेकेदारांची यादी दाखविली ती तिनशेपर्यंत होती. एक ठेकेदार माझ्याकडे आल्यावर म्हणाला की माझे २० लाखाचे बिल आहे तरी आपण शिफारस करावी. मी याबाबत कॅफोंकडे गेलो असता त्यांनी सांगितले की तो ठेकेदार २०० नंबरवर आहे. आम्हाला पैसे देता येणार नाही. आयुक्तांनी यादी दिलेली आहे. तरी अशी परिस्थिती कां आली आहे? कॅफोंकडे ठेकेदारांची गर्दी दिसुन येते. आयुक्तांच्या बाजुला आर्कीटेक्ट व बिल्डर. आज आपल्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाइला गेलेली असताना कधीतरी त्यांनी खातेप्रमुखांची मिटींग घेतली कां, कारण या या खात्याकडुन आपल्याला अमुक एवढे उत्पन्न यायला पाहिजे. एलबीटीसंदर्भात व्यापा-याची मिटींग घेतली कां? काल महापौर साहेबांनी एक मिटींग घेतली होती. प्रशासन मात्र मोठया प्रमाणात कसा खर्च करायचा, कशा फाईल मंजूर करायच्या हे पाहिले जाते. आत्ताच पाटणकर साहेबांनी सांगितले त्याप्रमाणे मूळ फाईलवर आयुक्तांची सही आहे तरी तेथुन कसे बजेट टाकले जाते,म्हणजे बजेट कोठुन टाकले जाते? एलबीटीसंदर्भात व्यापारी रजिस्ट्रेशन करण्याकरीता येत नाहीत. एलबीटीसंदर्भात आयुक्तांनी प्रशासनप्रमुख म्हणून कधी मिटींग बोलाविली नाही. शहराचे प्रमुख म्हणून मा.महापौर यांनीसुध्दा महापालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाईला गेली आहे तरी त्याबाबत काय निर्णय घेतले पाहिजेत याबाबत त्यांनी कोणतीच मिटींग बोलाविलेली नाही. आणि आज ही परिस्थिती निर्माण झाली आहे. व्यापारी एलबीटी भरत नाहीत, त्यांनी जनतेचा पैसा जमा केलेला असतो. पुर्वी मालावर जकात घेतला जात असे परंतू आता माल आणल्यानंतर तो सेल केल्यानंतर आपण एलबीटी घेतो. परंतु याबाबत प्रशासनाने कोणतीच भूमिका बजावली नाही. माजी मुख्यमंत्री मा.पृथ्वीराज चव्हाण साहेब असताना त्यांनी सांगितले होते की, तुम्ही एलबीटी ठेवायची की जकात ठेवायची हे ठाणे महपालिकेने ठरवायचे. परंतू यासंदर्भातसुध्दा आपण कोणता विषय घेतला नाही. तरी यासंदर्भात आपण जर महापालिका आता आार्थिक डबघाईला आली आहे व त्यामुळे एलबीटी रद्द करुन जकात सुरु करणेबबत जर एक ठराव करुन जर शासनाकडे पाठवला असता तरी चालले असते. ज्याप्रमाणे मुंबई महापालिकेमध्ये आतासुध्दा जकात वसुल केली जाते. आत्ताचे मुख्यमंत्री साहेबसुध्दा सांगतात की एलबीटी बंद करणार म्हणून. तरी याबाबत कांहीतरी निर्णय घ्या. केंद्रीय मंत्री मा.नितिन गडकरी हे सुध्दा सांगतात की एलबीटी बंद करणार म्हणून. आता व्यापा-यांना सांगण्यात यावे की जोपर्यंत आम्ही एलबीटी बंद करत नाही तोपर्यंत व्यापा-यांनी एलबीटी भरावी. परंतू अशाप्रकारचे कोणतेच निर्णय घेतले जात नाहीत. आता तुम्ही सत्तेवर आहात तरी सत्तेवर बसुन तुम्ही कांय निर्णय घ्यायचा तो घ्या. ठाणे महापालिकेमध्येसुध्दा शिवसेना-भाजपाची सत्ता आहे. तरी तुम्ही शिष्टमंडळ घेऊन जा आणि सांगा की एलबीटीमुळे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. कारण एलबीटीमध्ये स्टँपडयुटी भरावी लागते तेव्हा स्टँपडयुटीचे पैसे शासनाकडुन येण्यास किती कालावधी लागतो ते आपल्याला माहित आहे. तरी महापौर महोदय आपण आपल्या अध्यक्षतेखाली विरोधी पक्षनेते सभागृहनेते, गटनेते असे शिष्टमंडळ घेऊन मा.मुख्यमंत्री साहेबांशी चर्चा करावी की या ठाणे महपालिकेची तसेच शहराची परिस्थिती फार बिकट झालेली आहे. आज या महापालिकेचा "क" वर्ग होता तो आता ब वर्ग देण्यांत आलेला आहे. तरी ही महापालिका ब वर्गामध्येच रहावी ती क मध्ये जाता कामा नये अशी इच्छा आहे. महापौर महोदय, आज आपण चार ते पाच एजन्सीकडुन पाणी घेत आहोत. परंतू या पाण्याची कोठेतरी चोरी होत आहे. आपण जर पाहिले तर एक कोटी इतके पाण्याचे महिन्याला नुकसान होत आहे आणि वर्षाला बारा कोटी असे नुकसान होत आहे. परंतू याबाबत आपण कधीच चर्चा केली नाही. तसेच कांही लोकांना पाण्याची बिलेसुध्दा जात नाहीत. मध्यंतरी मिटर लावणेबाबत ठरले होते परंतू ते कां लावले जात नाही हे समजत नाही.प्रशासनाची तशी इच्छा नाही कां? मिटर जर लावले तर पाण्याची चोरी समजेल. महिन्याला जर पाण्याचे एक

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

कोटीचे नुकसान होत आहे व ते जर आपण भरुन काढले तर एका डिपार्टमेंटचा पगार त्यामधून देता येईल. आज आशियाखंडात सर्वात मोठी इंडस्ट्रीयल एरिया आहे तो वागळे इस्टेट. पुर्वी तेथुन जकात मिळायची परंतू आता परिस्थिती बिकट आहे. तरी याला जबाबदार कोण ? तेथून कंपनी सोडून कां गेले, तेथे आर झोन कसा केला याला जबाबदार कोण याचासुध्दा विचार करायला पाहिजे. आपल्याला तेथुन बराच महसुल मिळत असे. परंतू त्या महसुलीकडे आपण दुर्लक्ष केले आणि बिल्डरलॉबीला मदत केली.आपल्याकडे विकास प्रस्ताव येतात परंतू ते कोणी घेत नाही फक्त सीसी घेतात तरी याचे कारण शोधले पाहिजे आणि विकास प्रस्तावासंदर्भात आपण जे रेटलावले आहेत त्याबाबत विचार करायला पाहिजे. आज आपण अग्निशमन दलाचे रेट पाहिले तर जास्त आहेत व या सर्व कारणांमुळे विकासकांकडून विकास प्रस्ताव टाकले जात नाहीत. आज जी लोक कंपन्या सोडून गेल्या आहेत, त्यांना दुसरीकडचे रेट परवडले. व अशाचप्रकारे आता बिल्डरलॉबी बाहेर निघून जात आहे. महापालिका प्रस्ताव तयार करते, मूळ फाईलवर आयुक्तांची मंजुरी असते. परंतू याला बजेट कुठुन वापरले जाणार आहे? ज्यावेळी प्रशासन बजेट तयार करते व नंतर स्थायी समितीसमोर सादर केले जाते त्यावेळी खातेप्रमुखांकडून आयुक्तांना सांगितले जात नाही की यापुर्वीची जी कामे आहेत त्यांची बिले अदयाप देण्यात आलेली नाहीत म्हणून. आणिजी कामे चालू आहेत त्यांचीसुध्दी अदयाप बिले देण्यात आलेली नाहीत. ते तुमच्या बजेटमध्ये दाखविले जात नाही. तरी बिले देण्यासंदर्भात आपण विचार केला पाहिजे. आणि त्यानंतर हे बजेट स्थायी समितीसमोर सादर केले पाहिजे.

महापौर महोदय, आज कळवा हॉस्पीटल म्हणजे पांढरा हत्ती पोसण्यासारखे आहे. तेथील मेडीकल कॉलेजला आपण दरवर्षी २५ ते ३० कोटी रुपये खर्च करतो. परंतू महाराष्ट्र जिल्हयातील एकही मुलगा येथे शिकत नाही. हे मेडीकल कॉलेज एखादया ट्रस्टला दिल्यास महापालिकेला फायदा होईल. आज हॉस्पीटलची परिस्थिती पाहिल्यास तेथे रुग्णांना व्यवस्थित औषधोपचार केले जात नाही. तेथील मेडीकल स्टोअर्स , सिटी स्कॅन हे वादाच्या भोव-यात आहे. जे ॲग्रीमेंट केले जातात ते स्थायी समितीच्यानुसार नसतात, तसेच जे स्थायी समितीला अधिकार आहेत एखादया अटीशर्तीसंदर्भात ते अधिकार प्रशासनातील खातेप्रमुखांनी घेतले आहेत. मग एखादा कोर्टात गेला मग कोर्ट आणि महापालिका मग यात कोणताहीनिर्णय लागत नाही. सिटी स्कॅनवाल्यांनी ६२ लाख रुपये बुडवले होते यासंदर्भात प्रशासनाने कोणतीही भूमिका घेतली नाही. ठेकेदाराला ज्या अटी शर्ती वाटतील त्याप्रमाणे खातेप्रमुखांनी टाकायच्या. आम्ही प्रत्येकवेळी सांगितले की येथे खर्च करु नका. मध्यंतरी मी स्वतः मा.आयुक्तांना नाल्यासंदर्भात पत्र दिले होते की तेथे तो नाला नको म्हणून. यासाठी आपण ६० लाख फुकट खर्च करीत आहोत. परंतूत्यावर उत्तर देण्यात आले की ते मंजूर करण्यांत आलेले आहे. परंतू जेथे गरज होतीतेथे एसआरडी झालेली आहे आता तेथे नाल्याची गरज नाही.तरी आम्ही तपासुन पाहतो व सांगतो आी जर प्रशासनाची भूमिका असेल तर ती चुकीची आहे. जेव्हा आम्ही एखादे चुकीचे काम तुमच्या निदर्शनास आणुन देतो तरी तुम्ही पहात नाही तरी याकडेसुध्दा लक्ष दिले पाहिजे.

महापौर महोदय, दादोजी कोंडदेव स्टेडीयमचे ६० लाख रु उत्पन्न व खर्च तीन कोटी रुपये. तरी हासुध्दा पांढरा हत्तीच आहे व यावर प्रशासन कांय भूमिका घेणार आहे? आज त्या स्टेडियमवर कोणतीच मॅच होत नाही. आज ते स्टेडियम फक्त नावापुरते आहे.कधीतरी पोलिस बंदोबस्तासाठी तेथे जागा दयायची, एखादया करमणुक कार्यक्रमाकरीता जागा दयायची. तरी प्रशासन कांय करीत आहे, स्टेडियम कशासाठी ठेवण्यात आले आहे? तरी हे स्टेडियम एखादया ट्रस्टला दिल्यास त्यातुन महापालिकेला उत्पन्न मिळु शकेल.

नाटयगृहाची परिस्थितीसुध्दा अशाचप्रकारची आहे. गडकरी रंगायतन जरा व्यवस्थित चालत आहे,परंतू काशिनाथ घाणेकर नाटयगृहाची परिस्थिती कांय अहे? आणि अजुन नाटयगृह कशासाठी पाहिजे?

महापौर
महानगरपालिका ठाणे

आज ठाणे शहरातील कचरा टाकण्यासाठी डंपिंग ग्राऊंड नाही. आज महापालिकेत २२ वर्ष आमची सत्ता आहे. आज आमदारांना झाडु घेऊन कचरा काढावा लागत आहे.२२ वर्ष घाण केली आणि आज आमचे केळकर साहेब रस्त्यारस्त्यावर झाडु मारत आहेत. महापौर झाडूने कचरा काढत आहेत. आज या शहराची परिस्थिती कांय आहे. दोन हजार कोटीचे बजेट आहे असे आम्ही सांगत असतो परंतू कामे होत नाहीत. आम्ही रस्ते बनविले की प्रशासनप्रमुख हे पाच वर्ष हा रस्ता खोदला जाणार नाही व खोदल्यास त्यावर कारवाई करण्यात येईल असे पत्रक काढतात. आजतर हे ठाणे शहर रिलायंसच्या मालकीचे असल्यासारखे वाटते. आज त्यांनी पुर्ण ठाणे शहर खोदलेले आहे. एखादया झोपडपट्टीत एमएसईबी केबल टाकत असेल तर त्यांना परवानगी दिली जात नाही. परंतू रिलायंसला परवानगी दिली जाते तरी त्यांच्यापाठीमागे कोण उभा आहे? आपल्या ऑफीससमोरसुध्दा खोदुन ठेवले आहे.आज या कंपनीने ठाणे शहरातील चांगले रस्ते वोडाफोन,रिलायंस यांनी खोदलेले आहेत. त्यांना जसे पाहिजे तशा पध्दतीने खोदले आहेत, तरी याला जबाबदार कोण? त्यांना जेवढे परमिशन दिले आहे तेवढेच त्यांनी खोदले आहे का हे कोणीच पहात नाही. रस्ता बनविल्यानंतर जलवाहिनी,किंवा इतर वाहिन्या टाकल्या जातात तरी ही सिस्टीम बदलली पाहिजे. रस्ता खोदणेबाबत जर अधिका-यांना विचारले तर ते सांगतात रस्ता करण्यास मंजुरी आहे एवढेच उत्तर दिले जाते परंतू तो कुठपर्यंत बनविणेत येणार आहे किंवा कोण बनविणार आहेत याबाबतची माहिती दिली जात नाही. ठाणे शहरातील नागरीक प्रशासनाला हे प्रश्न विचारत नाहीत. हे सर्व नागरीक स्थानिक नगरसेवकांना विचारतात. आम्ही मागेच प्रशासनाला सांगितले होते की,एखादया वॉर्डात ड्रेनेज,गटाराचे किंवा तत्सम काम चालु असेल तर त्या कामाचे स्वरुप काय असणार आहे आणि तो किती दिवसात पुर्ण होणार आहे याबाबतचा तसेच ते काम कोण इंजिनिअर तसेच ठेकेदार करणार आहे त्यांची नावे त्या बोर्डावर असणे आवश्यक आहे त्याबाबतसुध्दा अदयाप कार्यवाही करण्यात आलेली नाही.

महापौर महोदय आज परिवहनची परिस्थिती बिकट आहे. आपण एक एक करोडच्या गाडया घेतल्या आहेत. परंतू या गाडया वळवण्यासाठी जागा कुठे आहे? आज ठाणे शहरामध्ये मोठमोठे रस्ते बनविण्यात आले आहेत परंतू ते रस्ते मोकळे नाहीत. सगळीकडे गाडया पार्क केलेल्या असतात. पार्कींगच्या प्लॉटवर जेव्हा पार्कींगची आवश्यकता आहे त्याठिकाणी शहरविकास विभागाने २०-२० मजल्याचे टॉवरला मंजुरी देण्यात आलेली आहे. आज आपण ठाणे शहरातील वाहतुककोंडीचा प्रश्न सोडवु शकत नाही.अशीच जर महापालिकेची आर्थिक परिस्थिती जर अशीच राहीलीतर ही महापालिका बरखास्त करावी लागेल. आज नागरीक आम्हाला विचारतात की आमच्या शहराचा विकास कां झाला नाही. आपण प्रत्येक खाते प्रमुखांच्या मिटींग अदयाप कां घेतल्या नाहीत? सभागृह नेते हे सभागृहाचे नेते आहेत,आज तुमच्या कारकिर्दीत ही अशी परिस्थिती कां आली आहे? तरी अशी परिस्थिती कां निर्माण झाली याबाबत महापौर महोदय आपण खाते प्रमुखांच्या मिटींग घेतल्या पाहिजेत.

प्रॉपर्टी टॅक्सबाबत सांगायचे तर सातशे रुपये टॅक्स येत असेल परंतू प्रशासकीय आकार सात हजार. व हे चक्रवाढव्याजासारखे वाढतच चालले आहे. आज महासभेसमोर प्रकरण आणले आहे व याबाबत महासभेत कांहीतरी निर्णय घेण्यात यावा. तरी या कालावधीमध्ये तुम्ही जर टॅक्स भरला नाही तर तुमच्याकडुन प्रशासकीय आकार वसुल केला जाईल. अनेक टॅक्सधारकांनी अर्ज केले परंतू त्यांनी अर्ज सादर केल्यानंतर तुम्ही मालकाकडुन एनओसी आणा तरच तुम्हाला टॅक्स लावला जाईल. असे असेलतर त्याच्याकडुन ॲफेडेव्हिट कां घेतले जाते? माझ्या मते प्रशासनाची उत्पन्नाबाबत इच्छाशक्ती नाही. ज्यावेळी वर्षाचे बजेट मंजुर करण्यासाठी महासभेत येते त्यावेळी त्यावर प्रत्येक नगरसेवक आपापल्या वॉर्डा कामे होण्याबाबत चर्चा करत असतात त्यावेळी उत्पन्न कोठुन मिळेल याबाबतसुध्दा चर्चा करतात परंतू जे मिनिट केले जाते त्याची प्रशासन अंमलबजावणी करत नाही. आज सॅटीसकरीता आपण करोडो रुपयेखर्च केले आहेत.

महापौर

१०/-

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, महाराष्ट्राच्या लोकप्रतिनिधीचे नांवे घोषित व्हायला पाहिजे.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

सन्मा.नजीब मुल्ला साहेब, मला वाईट वाटते, मला दुर्दैव वाटते की, आपण माझे मित्र आहात, माझ्या पक्षाचे सदस्य आहात .. .. ..

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा. महापौर महोदय, मित्राचे नाते नाही. कायदयाप्रमाणे सभागृहा पुढे नांव यायला पाहिजे. सभागृहावर आरोप होईल.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

मा.आयुक्त महोदय, मी जे वाक्य बोलतोय ते जबाबदारीने आणि अभ्यासाने बोलतोय. ते शोधून काढण्याचे काम प्रशासनाचे आहे माझे नव्हे. मी नांव न घेता या सभागृहावर आरोप केला आहे. त्याप्रमाणे रेंटल हाऊसिंगमध्ये चार एफ.एस.आय., पाच एफ.एस.आय. देत असताना या रेंटल हाऊसिंगच्या माध्यमातून ज्या मंजू-या देण्यात आल्या होत्या, या रेंटल हाऊसिंच्या माध्यमातून जेंव्हा योजना गुंडाळण्यात आली होती त्या ही नंतर किती इमारतींना सी.सी. देण्यात आली हे सुध्दा मा.आयुक्त महोदय तपासण्याची गरज आहे आणि त्यामुळे अशाप्रकारच्या गोष्टीकडे ओपन लँड टॅक्सेशन आकारणीमध्ये मोठया प्रमाणावर गैरप्रकार.. ओपन लँड टॅक्सेशनवर आपण काहीतरी आययोजना शोधून काढली पाहिजे आणि या संदर्भात कारवाई कारण मा.महापौर महोदय, आपल्याला संधी मिळालेली आहेत. हे जर विषय आपण घेतले तर येणा-या अडीच वर्षामध्ये या महानगरपालिकेचे उत्पन्न दुप्पटीने नव्हे तर १०० पटीने वाढविण्याचे संपूर्ण श्रेय आपल्याला या ठिकाणी प्रथम नागरिक म्हणून मिळेल आणि महापौर महोदय, त्यासाठी आमची आपल्याला साथ असेल हे मी आपल्याला सांगू इच्छितो. मा.आयुक्त महोदय मी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर आजपासून जर धडक मोहिम घेतली तर पुढच्या तीन महिन्यामध्ये ५०० कोटी रुपये वसूल होतील.

शैक्षणिक भुखंडांची प्रकरणे :-

मा.आयुक्त महोदय, शैक्षणिक भुखंडाची थोडीफार प्रकरणे आपण तडीस लावलेली आहेत. म्हणजे फायनल स्टेजला आहेत. मात्र गेली चार वर्ष ते का रेंगाळत ठेवले आहेत. सध्या २० भूखंडातून सुमारे १५० कोटीचे उत्पन्न मिळू शकेल आणि त्यासाठी प्रशासकिय गतिमानता आणावी लागेल. तसेच उर्वरित आरक्षित भुखंड सुध्दा याच पध्दतीने ताब्यात घेऊन पीपीपी वर दिल्यास पुढील काही वर्षात कोटींचे उत्पन्न मिळेल. त्या रेमंड कंपनीमध्ये, त्या व्होल्टास कंपनीमध्ये कितीतरी भुखंड आरक्षित आहेत. त्यांना त्यांचे नविन विकास प्रस्ताव आपण मंजूर केले. मग त्यावेळेस डीसी रुल्स काय सांगतं की, ते आरक्षित भूखंड आपल्या नांवावर सात-बारा झाले का? नाही झाले पाहिजे तर तपासून पहा कितीतरी कंपन्या आहेत. कितीतरी ॲमेनिटीज, कितीतरी आर.जी., कितीतरी गार्डन्स आहेत. त्यामुळे हया ठिकाणी मा.आयुक्त महोदय, जर पी.पी.पी. च्या माधमातून डेव्हलपमेंट केली तर जशी आमच्या वॉर्डामध्ये बीएसयुपीच्या माध्यमातून २२ कोटीची बचतच झाली नाही मात्र अधिक सदनिका आपल्याला मिळाल्या , आपला ५० कोटी खर्च वाचला आणि आपल्याला ५० कोटी रुपये अधिक मिळाले. अशाप्रकारची कल्पकता आपल्यामध्ये आहे. आपण आटीचे अभ्यासक आहात. आपण हया सगळया योजना आपल्या अधिका-यांना हाताशी घेऊन ज्याप्रकारे चंद्रशेखर साहेबांनी एक योजना आखली होती एकात्मिक रस्ते विकास योजनेची. तशी पीपीपीची एकात्मिक योजना आपण या ठाणे शहरात राबवली तर मला वाटते दोन हजार कोटींचा फायदा ठाणे महापालिकेला झाल्याशिवाय राहणार नाही हे मी जबाबदारीने बोलतोय.

पाणी पुरवठा आकार :-

घालणे मला गरजेचे वाटते. मा.आयुक्त महोदय, सन २००८-०९ साली ७५ कोटी रुपये, सन २००९ ला ७८ कोटी रुपये, सन २०१० ला ८७ कोटी रुपये, सन २०११ ला ९४ कोटी रुपये, सन २०१२ ला ९५ कोटी रुपये , सन २०१३-१४ ला १०० कोटी रुपये आणि आपल्याला १४१ कोटी रुपयेउत्पन्न अपेक्षित आहे. मात्र त्यातील फक्त १५% म्हणजे ३५ कोटी रुपये जमा झाले आहेत. मा.आयुक्त साहेब, हे महापालिकेचे दुर्दैव आहे. ४७२ एमएलडी पाणी जर आपण लोकांना देतो तर त्या पाण्याची वसूली एवढी कमी का? ४७२ एमएलडी पाण्याची वसूली जर आपण केली तर मला वाटतेउत्पन्न अडीचशे कोटीवर जाईल. पाणी चोरी, अमुक योजना, तमुक योजना हया योजना जरी आपण बाजूला ठेवल्या तरी अडीचशे कोटीवरउत्पन्न जाईल. पण खेदाने त्याची कारणे मी तुम्हाला सांगतो. वारंवार अनधिकृत नळ जोडण्याबाबत आम्ही संबंधित अधिका-यांना सांगतो. तिथे टॅपिंग केले आहे, अभय योजना राबवा. काहीही होत नाही अधिकारी केबिनमध्ये बसून राहतात. सहोब, वर्तकनगर प्रभाग समिती पुरते बोलायचे झाले तर एक अभियंत्याकडेउप अभियंता पाणी खात्याचा चार्ज दिला आहे. मात्र दोन वर्ष झाली त्यांनी चार्ज घेतलेला नाही. तो अभियंता बांधकाम खात्यात काम करत आहे. साहेब, आमच्या वर्तकनगर प्रभाग समितीतउप अभियता नाही हे तुम्ही माहिती करुन घ्या. त्याच्यावर कारवाई करण्याची हिंमत प्रशासनाच्या अधिका-यांकडे नाही. कारण त्याच्या मागे मोठ-मोठी मंडळी आहे. मा.आयुक्त महोदय, पाण्याची मोठया प्रमाणावर चोरी आणि गळती जरी थांबविले तर जे ४७२ एमएलडी पाणी आपल्याला लागते ते आपण ४०० एमएलडीवर आणू शकतो आणि ७२ एमएलडी पाण्यीच बचत आपण करु शकतो आणि तेवढे पैसे आपल्याला कमी दयावी लागतील. साहेब, पाणी चोरी कोण करतो हे जग जाहिर आहे. मोठ-मोठया लोकांची नांवे पाणी चोरीमध्ये आहेत. परंतू यासाठी अधिका-यांचे पाठबळ आहे. आज गोर-गरीबांच्या नळ जोडण्यावर आपण लगेच कारवाई करतो. पण मोठ मोठे पुढारी, विकासक आहेत त्यांच्यावर आपण कारवाई करत नाही आणि त्यामुळे पाणी चोरी व गळती थांबवली तर ७२ एमएलडी पाण्याची बचत होईल आणि दरवर्षी दहा ते १५ कोटीची बचत हया ७२ एमएलडी पाण्यातून होईल. म्हणून मा. महापौर महोदय, आपण मला घेऊन बसत जा. मी आपल्याला सांगेन. माझा सल्ला नाही पण थोडया सूचना घ्या. आणि यानंतर पाणी बिल चोरीच्या प्रकरणांत वाढ आणि टँकरमधून पाणी चोरीचे प्रकार आता टँकर मुक्त झाले आहे. तरीही टँकर येतात. ते कुठून भरुन येतात हे तपासणे गरजेचे आहे. मा.आयुक्त महोदय, काही सोसायटयांमध्ये टँकर येतात ते कुठून भरुन येतात ते तपासा. कारण नगरसेवकांनी फोन केला तर टँकर भरुन दिला जात नाही. परंतू साकेत सारख्या ठिकाणी आणि विकासकांना आज ही टँकर भरुन दिले जातात असा माझा स्पष्ट आरोप आहे त्यामुळे ते तपासणे गरजेचे आहे. पाणी बिलांची डिमांड नोटीस वेळेवर न लावणे. आजही पाणी बिलांच्या डिमांड नोटीसा अजूनही नागरिकांपर्यंत पोहचलेल्या नाहीत. हया नोटीसा जानेवारी, फेब्रुवारीमध्ये पोहचणार. काही ठिकाणी संगणकीकरण नसल्यामुळे कार्यालयामध्ये येऊन नोटीसा घ्यायच्या आणि मग ते पैसे भरायचे, लवकर भरायचे या संदर्भातील गैरप्रकार, या संदर्भातला येणारा पैसा या माध्यमातून पाणी बिलातून येणारी मुळ रक्कम वसूल होण्यावर परिणाम होतो आणि त्यामुळेउत्पन्नाचे साधन आणिउत्पन्नाचे माध्यम कमी होते.

प्रशासनाचीउदासिनता आणि अनास्था यामुळे आज एकही अधिकारी पाणी खात्यात काम करायला तयार नाही. जोउठतो तो शहर विकास विभागच पाहिजे. दुसरा आयएनडीपी संपले की, बीएसयूपी येता, बीएसयूपी संपले की, पी.१, पी.२ मध्ये येतो हे लागेबंध बंद करायला पाहिजेत. सर्व अधिका-यांना समान न्याय दिला पाहिजे. सर्व अधिका-यांना सर्व प्रकारचे कर्तव्य बजावण्याचे अधिकार आणि न्याय दिले पाहिजे. एक सर्क्यूलेशन पाहिजे. मा.आयुक्त महोदय, हे तपासणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, हयानंतर एक महत्वाचा विषय आहे अग्निशमन विभाग. मांडके साहेबांचा विभाग. या विभागावर मी थोडसं बोलणार आहे.

फायर चार्जेस सन २००८ साली ८ कोटी रुपये वसूल झाले. सन २००९ साली १६ कोटी रुपये वसूल झाले, सन २०१० साली २३ कोटी वसूल झाले. सन २०११-१२ साली २० कोटी वसूल व्हायला पाहिजे होते ते ११ कोटी वसूल झाले. म्हणजे सन २०११ सालचे फायर चार्जेस पाहिले तर २०११ साली २३ कोटी वसूल झाले होते. तर सन २०१२ साली फक्त ११ कोटी झाले. म्हणजे ५० कोटी रुपये फायर चार्जेस कमी वसूल झाले. आणि त्यानंतर सन २०१२-१३ ला २२ कोटी वसूल व्हायला पाहिजे होते ते १६ कोटी वसूल झाले. म्हणजे २०१०-११ मध्ये जेवढे वसूल झाले होते त्यापेक्षा पुन्हा कमी वसूल झाले. त्यानंतर

महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**श्री. मनोज शिंदे :-**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी काँग्रेस पक्षाचे गटनेते विक्रांत चव्हाण हयांनी चौकशीची मागणी केलेली आहे. त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये ब-याच भ्रष्टाचारीउदाहरणं या ठिकाणी आवाहनात्मक प्रशासनाला दिलेली आहेत. त्या ठिकाणी नक्कीच भ्रष्टाचार झालेला आहे अशाप्रकारे त्यांनी त्यांच्या भाषणातून वक्तव्य केलेले आहे. त्यांनी जी मागणी केली आहे की, याची सीबीआयमार्फत चौकशी व्हावी. त्याला माझे हया ठिकाणी काँग्रेस पक्षाच्या वतीने अनुमोदन आहे. सादरची बाब ही भ्रष्टाचाराच्या माध्यमातून देखिल या ठिकाणी सन्मा. श्री. नारायण पवार हयांनी ही महापालिका बरखास्त करावी अशी देखिल मागणी हया ठिकाणी केलेली आहे. त्याला देखिल या ठिकाणी माझे अनुमोदन आहे. म्हणून हया सर्व गोष्टींचा आपण गांर्भियपूर्वक विचार करुन या भ्रष्टाचाराच्या मागणीप्रमाणे आपण कारवाई करावी. एवढीच विनंती. धन्यवाद.

**श्री. दिपक वेतकर :-**

मा.महापौर महोदय, आता या ठिकाणी सन्मा. सदस्य श्री. विक्रांत चव्हाण हयांनी भ्रष्टाचाराबाबत जी मागणी केली आहे. त्याच बरोबर ज्या ज्या नगरसेवकांनी विकास प्रस्ताव व ठेकेदारांवर जे आक्षेप नोंदविले आहेत त्यांच्यावर आपण काय कारवाई केली आहे? त्यांची सुध्दा श्वेत पत्रिकेमध्ये नोंदणी व्हावी.

**श्री. अशोक वैती :-**

मा.महापौर महोदय, हया ठिकाणी सीबीआयमार्फत चौकशी होणार नसली तर अँण्टी करप्शनमार्फत चौकशी होणे गरजेचे आहे. आणि महापालिका बरखास्त करण्याची जी सूचना आहे त्याला माझे अनुमोदन आहे. बरखास्त होणार असेल तर हरकत नाही.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

सरकारकडून जी ग्रँड आली आहे त्या ग्रँडमध्ये सीबीआय चौकशी लागू शकते. हा कायदयातील नियम आहे.

**श्री. मनाजे शिंदे :-**

मा.महापौर महोदय, सीबीआय चौकशी लागू शकत नसेल तर अँण्टी करप्शन चौकशी लावा. पण चौकशी लावा.

**श्री. अशोक वैती :-**

मा.महापौर महोदय, कुठली तरी चौकशी लागू दया लोकांसमोर काय ते येऊ दया.

**श्री. हिरा पाटील :-**

मा.महापौर महोदय, आज या ठिकाणी ठाणे महानगरपालिका डबघाईला जबाबदार कोण हा विषय सन्मा. सदस्य श्री. मनोज शिंदे आणि सन्मा. सदस्य श्री. संजय घाडीगांवकर यांनी जो लक्षवेधीला घेतलेला आहे. या विषयावर इथे खुप मोठी-मोठी भाषणे झाली. मा.महापौर महोदय, मा.आयुक्त महोदय, हया विषयाबाबत मी आपणांस विनंती करतो की, पहिल्या प्रथम जो हया लक्षवेधीचा विषय आहे ठाणे महानगरपालिका डबघाईला जबाबदार कोण याचेउत्तर आम्हाला स्पष्टपणे दयायला पाहिजे. कारण इतका वेळ चर्चा करुन, सचिन तेंडुलकर, विराट कोळी चागले दोन-दोन, तीन-तीन शतके मारणारे दोन-दोन तास भाषण करुन गेले पण हया प्रश्नाचेउत्तर मला मिळणे आवश्यक आहे.

मा.महापौर महोदय, आज ठाणे महापालिका आणि ठेकेदारांची बीलं या विषयांवर बराच जणांचा कल दिसून आला. महापौर महोदय ज्यावेळी आपण ठाणे महापालिकेच्या वसूली बाबीवर बोलतो. बरेचसे सदस्य बोलतात हे करायला पाहिजे ते करायला पाहिजे. प्रामुख्याने बालतात आणि मोठ-मोठे आकडे सांगतात. पण मी एक निश्चितपणे सांगतो की, १३० नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागातील भ्रष्टाचार उडकीस आणला तर ही वेळ येणार नाही. या सभागृहामध्ये प्रश्नोत्तरे किंवा एखादया ठेकेदारावर मेहमी

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

आरोप होत असतात. एतका एफएसआय केला, इतके पैसे खल्ले, इतका भ्रष्टाचार केला नंतर हया प्रश्नांचे काय होते? मा.महापौर महापौर महोदय, कुठे जातात हे प्रश्न? हया प्रश्नांचीउत्तरे सभागृहातील सर्व सदस्यांना मिळणे अपेक्षित आहे. कोण कुठल्या हेतूने मागतो पण माझ्या ते आपण सगळया नगरसेवकांनी एखादयावर आरोप करतो त्यावेळी ठाणेकर जनतेचा विचार करुन आपण आरोप करत असतो. हया ठाणेकर जनतेच्या कर रुपाने मिळणा-या पैशाने ही ठाणे महानगरपालिका चालते. आणि असे भ्रष्टाचार जेंव्हा होतात आणि त्या भ्रष्टाचारांबाबत सभागृहामध्ये मोठ-मोठी भाषणे होतात, मोठ-मोठयाने आवाज काढतात. आणिअ्रडकीस आणण्याचा प्रयत्न करतात. व्हाईट पेपर आणण्याचा प्रयत्न करतात. व्हाईट पेपर जरुर आणा. पण हया व्हाईट पेपरवर ही वस्तूस्थिती आणा की, कोणी कोणी किती प्रश्न विचारले आहेत. आणि त्या प्रश्नाचे पुढे नंतर काय झाले ते माझ्या ठाणेकर बंधूंना बघायला मिळायला मिळाले पाहिजे. मा.महापौर महोदय, ब-याचशा अधिका-यांच्या वर्मावर बोट ठेवून त्यांच्याकडून बरीचशी कामे करुन घेतली जातात. म्हणजे ठाण्याच्या विकासाचे नांव घेऊन कामे करुन घेतली जातत पण नंतर दोन-तीन दिवस गेल्यानंतर तो विकास मा.महापौर महोदय, कुठे जातो? ठाण्याच्या विकासासाठी इथे मोठ-मोठयाने बोलत असता मग तो विश्वास कुठे जातो? मा.महापौर महोदय, आज पूर्णपणे अधिकारी वर्गावर अवलंबून चालणार नाही. अधिकारी वर्ग कामचुकार आहे परंतू आपल्या सारख्यांचा त्यांना हातभार लागल्यानंतर एलबीटी सारख्या विषय असो किंवा इतर कुठलाही विषय त्यांना सोपा जाणार आहे. म.महापौरम महोदय, स्थानिक संस्था कराचे ५६२ कोटीचेउद्दिष्ट होते. तो माहे डिसेंबर पर्यंत ३०० कोटीपर्यंतउद्दिष्ट पूर्ण झाले आहे. म्हणजे तीन महिन्यात तो पण कव्हर होण्यासारखा दिसतो. हयाच्यामध्ये सर्वात कमी शहर विकास विभाग दिसतो. २५८ कोटी रुपयाचेउद्दिष्ट होते त्यापैकी आतापर्यंत फक्त ८० कोटी रुपये जमा झाले आहेत असे दिलेल्या आकडेवारीवरुन दिसून येते. त्यामुळे वसूलीकडे लक्ष देणे जरुरी आहे.

आपल्याकडे विकास प्रस्तावाच्याबाबतीत जास्त करुन लिगल बांधकाम करतात त्यांच्यावरच जास्त बोलतात. पण जिथे अनधिकृतरित्या बांधकाम होतात. तिथे अग्निशमन विभागाची परवानगी नसते. काही लोक बघत असतात की, मार्च गेल्यानंतर टॅक्स वाचेल असे प्रकार होत असतात. यासाठी मा.आयुक्त महोदय, माझ्या माहितीप्रमाणे आपण सॅटेलाईटवरुन प्रत्येक विभागाचा सर्व्हे केला होता. त्या सर्व्हेचा माप समोर ठेवून त्याप्रमाणे टॅक्स आकारणी झाली आहे की, नाही हे पडताळून पाहणे आवश्यक आहे. सेक्टर १ ते ११ पर्यंत तुम्ही सगळं बघून घ्या. कारण याच्यामुळे आपला निश्चितपणे कर वाढणार आहे. मा. महापौर महोदय, एखादी चाळ असते आणि त्या चाळीच्या ठिकाणी नंतर बांधकाम होते आणि बांधकाम झाल्यानंतर एक चाळीची तिथे किमान साठ-सत्तर घरे होतात. पण आपल्या पाणी विभागाच्या संपूर्ण दुर्लक्षामुळे एकच पाण्याची ८०/- रुपयाप्रमाणे बील त्या चाळीला लागले जाते आणि साठ-सत्तर घरांना पाणी आपण फुकट देतो. मा.आयुक्त महोदय, हया ठिकाणी सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, अनधिकृतपणे नळ कनेक्शन चोरणा -यांना मी स्वतः पोलिस स्टेशनला नेलेले आहे. परंतू मा.आयुक्त महोदय, आपल्या अधिका-यांनी त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. अशावेळेला का कारवाई करत नाही? साहेब, अशा अधिका-यांना बोलावून घ्या आणि तो सक्षम नसेल तर त्याला त्या जागेवर बसवू नका. कारण हा संपूर्ण ठाणेकर जनतेचा विषय आहे. या ठिकाणी विकासाचा विषय घेतल्यानंतर प्रत्येकाला विकास हवा आहे. पण हा विकास करण्यासाठी जे आर्थिक बळ पाहिजे त्या आर्थिक बळाचा विचार करणे देखिल जरुरीचे आहे. मा.महापौर महोदय, हया सभागृहात ठराविक लोक सोडल्यास आम्ही सगळे नविनच आहोत. बोलण्यामध्ये, कामामध्ये सगळयांतच मागे आहोत. पण आमच्या कामांचा विषय आल्यानंतर आमच्या कामांवर पूर्णपणे दुर्लक्ष होते. मा.महापौर महोदय, आज मी मोठया अभिमानाने सांगू शकेन की, सेक्टर ११ मध्ये जास्ती जास्त लिगल कामं चालू आहेत. पण सेक्टर ११ मध्ये तुमच्याकडून काय आहे? मा.आयुक्त महोदय, खुलासा करतील त्यावेळी त्यांनी दिव्यातील सेक्टर १० आणि ११ मधील महापालिकेचा रस्ता आम्हाला दाखवून दयावा अशी माझी विनंती आहे. कारण भारत गिअर ते दिवा रोड हा जो रस्ता आहे तो रस्ता डि.पी. सोडून आहे. अस्तित्वातील रस्त्यावर तो तसाच केलेला आहे. तिथे आपण एकाही डी.पी. चा विकास केलेला नाही. ज्या शेतक-याच्या जमिनी बाधित झालेल्या आहेत त्या शेतक-याच्या टीडीआर चा विषय जेंव्हा येतो तर त्यांना ०.५ एफएसआय त्यांना देऊ इतकेच आश्वासन त्यांना आपण देतो. मा.महापौर महोदय, जर समोरच्या माणसाला १०० रुपये देयायचे असतील आणि तुम्ही तर त्याला ५ रुपये देता हा कुठल्याप्रकारचा न्याय ते आम्हाला समजत नाही.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

मा.आयुक्त महोदय, ज्यावेळी ठाणे नगरपालिका होती त्यावेळी ३२३ खेडी हया नगरपालिकेमध्ये विलीन झाल्यानंतर ठाणे नगरपालिकेची ठाणे महानगरपालिका झाली. मा.महापौर महोदय, माझ्या सर्व ठाणे कर भुमिपुत्रांचा प्रत्येकाचा त्याग आहे. मा.महापौर महोदय, संपूर्ण ठाण्याचा इतिहास बघा. ठाण्यात किती शौचालय आहेत? ठाण्यामध्ये स्मशानभूमीला किती जागा देण्यात आलेल्या आहेत? जी जागा असेल ती आरक्षणाची जागा असेल. आमच्या सेक्टर १० आणि ११ मध्ये बघा त्या जागा आमच्याच ग्रामस्थांनी दिलेल्या आहेत. मा.आयुक्त महोदय, ज्या लोकांनी ठाणे महानगरपालिकेला जमिन दिली असेल त्यांनाही त्या जमिनीचा मोबदला कुठेतरी दयायला पाहिजे हे ही आपण लक्षात घ्यावे. कारण कोणताही विकास करताना आधी जमिन लागते. जर जमिन देणा-यांना मोबदलाच देणार नसाल तर ते लोक जमिनी कशाला देणार आणि जर जमिनच नसेल तर तुम्ही रस्ता कसा करणार? आणि रस्ताच नसेल तर तिथे विकासक काम तरी कसे करणार आणि विकासकोने काम केले नाही तर टॅक्स रुपाने, किंवा शहर विकासाच्या माध्यमातून आपल्याला महसूल कसा मिळणार?

मा.आयुक्त महोदय, आज केंद्रशासन आणि महाराष्ट्र शासनाची सत्ता परिवर्तन झालेली आहे. सत्ता परिवर्तन झाल्यामुळे आपल्या आदरणीय मोदींचे वाक्य आहे अच्छे दीन आयेंगे. आपल्या ठाणे महापालिकेला केंद्राच्या वतीने आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने किती पैसे आले आणि आपले किती अच्छे दिन आले ते आपल्या भाषणातून ठाणेकर जनतेला आणि सभागृहातील आम्हा सदस्यांना पण सांगावे. या या सभागृहातील प्रत्येक सदस्य विकासासाठीच इथे येतो. विकास नको असे कोणालाही वाटत नाही. मा. महापौर महोदय, आज ठाण्यासारख्या ठिकाणी पूर्णपणे नंदनवन केलेले आहे. ब-याचशा नगरसेवकांना तिथे कामे शोधावी लागत असतील की, आपण ही निधी कुठे वापरायची? कारण त्यांच्याकडील रस्ते सीसी आहेत. गल्ल्या युटीडब्ल्यूटी आहेत. प्रत्येक ठिकाणी ८०% कामे झाली असतील असे मला वाटते. कारण मी जर बोललो तर बाकीची लोक बोलतील आमच्याकडे कामे झालेली नाहीत. पण त्याच्या विरुध्द आमच्या ग्रामीण भागामध्ये २५ वर्षात एखादा रस्ता तरी दाखवा. आज ठाणे महापालिकेचे डंपिंग ग्राऊंड होतय ते कोपरीला होतयं. कोपरी नंतर घोडबंदरला तिथे आरक्षण होतयं. मा.महापौर महोदय, कोपरीला चांगली माणसे राहतात, तिथे कचरा नकोय तिथे सुशिक्षित माणसं राहतात. मग ही घाण टाकायची कुठे? चला दिव्यामध्ये. असे का हो? खायचे तुम्ही आणि घाण आम्हाला? मा.महापौर महोदय, हसण्यावारी विषय घ्या कारण वस्तूस्थितीवर कोणीही हासतं. कारण ही वस्तूस्थिती आहे. आपल्या ठाणे महापालिकेला इतहकी वर्ष होऊनही आपले स्वतःचे डंपिंग ग्राऊंड नाही असे का? सभागृहात वारंवार पाण्याच्या विषयावर बोलले जाते. आमचे आदरणीय विक्रांत चव्हाण साहेबांनी सांगितले पाण्याचे योग्य ते नियोजन केल्यानंतर ७२ एमएलडी पाणी वाचू शकते. साहेब, आज आम्ही आमच्या पाण्याच्या टाकीवर जातो. २५ लाख लीटर पाणी आमच्या विभागाला दिले जाते. आम्ही जातो तेंव्हा टाकी भरलेली दिसते. २५ लाख लिटर पाणी दिले जाते पण प्रत्यक्षात गावापर्यंत किती पाणी पोहचते? २०० लीटर पाणी सुध्दा पोहचत नाही. मग हे पाणी जातं कुठे? आमच्या भाषेत हे पाणी मुरते कुठे? हयाबाबत मा.आयुक्त महोदय, आपण लक्ष दयावे अशी विनंती आहे. मा. महापौर महोदय, सर्वात महत्वाचे म्हणजे पाणी आणि ते जर आपण हया जनतेला देऊ शकलो नाही तर दुसरे काहीही देण्याची आपली लायकी नाही. काय आपली पात्रता आहे? कशाला आपण २५ करोड, ३५ करोडच्या वार्ता करतो? आम्हाला आमची जनता बोलते आम्हाला हंडा, दोन हंडे पाणी दया. आम्ही ठाणे महापालिकेमध्ये असल्याची आम्हाला शरम वाटते. बाजूच्या ग्रामपंचायत गावांमध्ये जा तिथे पाणी धो-धो वाहते. आज आपल्याकडे कुठल्याही प्रकारचे नियोजन नाही. मा.आयुक्त महोदय, आपले प्रत्येक अधिकारी सक्षम आहेत. पण ते सक्षमतेने काम करतात का? जर आमच्या सारखे सदस्य जर असे बोलतो की, आमच्याकडे २५ लाख लिटर पाणी दिले जाते आणि त्या ठिकाणच्या शेवटच्या घरापर्यंत २०० लीटर पाणी पोहचत नाही. मग ते पाणी कुठे मुरते? मा.आयुक्त महोदय, आपण कृपया याची नोंद घेऊन संबंधित अधिका-यांना याचा जाब विचारावा.

मा.महापौर महोदय, दुसरी खेदाची गोष्ट सांगतो की, ठाणे महानगरपालिकेमध्ये अनधिकृत नळ कनेक्शन लावली जातात. आपले अधिकारी मार खातात. तरी पोलिस स्टेशनमध्ये, शासनाकडे कोणतीही तक्रार केली जात नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. मा.आयुक्त महोदय, जर आपल्याला हया गोष्टीचा खुलासा करायचा असेल तर मुंब्रा विभागातील सर्व अधिका-यांना बोलवा आणि त्यांना हा प्रश्न विचारा

महापौर
महानगरपालिका ठाणे.

आणि हयाचा खुलासा मागवा. आणि जर त्यांनी मार खल्ला असेल तर त्यांनी तक्रार का केली नाही, कुठे पाणी मुरतयं?

मा.महापौर महोदय, जेंव्हा आपण विकासाच्या गोष्टी करतो कारण पुढच्या महासभेमध्ये माझी घनकचरा विषयी लक्षवेधी आहे. या ठिकाणी ब-याच वेळा अर्थसंकल्पावर चर्चा होते. त्यावेळेस मा.आयुक्त महोदय, प्रत्येक प्रभाग समिती वाईज आपण कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रत्येक समिती वाईज छोटासा भूखंड का ठेवला जात नाही? ठाण्याहून कचरा डंपिंग ग्राऊंडपर्यंत कचरा नेण्यासाठी तिथे करोडो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार होतो. आमच्या हिशोबाने २०० ते ३०० टन कचरा तिथे जातो. पण ठाणे महानगरपालिकेच्या हिशोबाने ६०० टन कचरा जातो पण ३०० टनाची तफावत कुठे आहे? आपण मोजायला चुकतो की, ठाणे महापालिका कुठेतरी जास्त लावते? हे ही तपासणे गरजेचे आहे.

एखादया गरिब घराणातील प्रत्येकाची इच्छा असते की, आमचे चांगल्याप्रकारे लग्न व्हावे. सर्वांना बोलावतात पण आर्थिक परिस्थिती बघितली तर तो प्रत्येकाला ब्रेक लावतो. हळदी समारंभासाठी इतका खर्च नको कारण आपला बजेट लिमिटेड आहे. मंडप नको, हॉल नको, ठाणे महापालिकेच्या खुल्या रंगमचावर करु या ही त्याची भावना असते. त्याच्या भावनेच्या मागचा हेतू इतकाच असतो की, माणसाची आजची परिस्थिती अतिशय खराब आहे. म्हणून ते खर्च कमी करण्याचा प्रयत्न करतात. आज ठाणे महापालिका सांगते की, आपली परिस्थिती खराब आहे. मग नाही ते चोचले कशाला पाहिजेत? उदाहरणं खुप आहेत आणिउदाहरण दिल्यानंतर इथे प्रत्येकाला राग येईल.

मा.आयुक्त महोदय, माझे वैयक्तीक मत असे आहे की, संपूर्ण ठाण्याचा सर्व्हे होण्याची गरज आहे. आपल्या अधिका-यांना सांगा की, प्रत्येक काम जेंव्हा होईल त्याची नोंद आपल्या रेकॉर्डमध्ये असणे जरुरीचे आहे. मा. महापौर महोदय, एकच कामं डबल-डबल होत असतात आणि आपण खर्चाची बोंब करत असतो. ज्या ठिकाणी कामं नाहीत ती करा. आमच्या सारख्या काही सदस्यांना बरेच काही माहिती नसते. तिथली मातीउचलून दोन लाखाची फाईल केली. हया गोष्टी आम्हाला समजणे गरजेचे आहे. असे जेव्हा विषय येतात तेंव्हा हे गृहित धरायला हरकत नाही की, ठाणे महानगरपालिका अधिकारी नाही तर ठेकेदार चालवतात. कारण आज खर्चाबाबत आणि कामासंदर्भात खुप जण बोलली आहेत. मा.आयुक्त महोदय, मी हया ठिकाणी जे काही बोललो मी काही अभ्यासू नाही. मनात नाही, पण जे काही बोलतो ते वस्तूस्थिला धरुन आहे. मा.आयुक्त महोदय, मी माझ्या शब्दाप्रमाणे तुम्हाला प्रत्येक परिस्थिती वॉर्डामध्ये दाखवीन. हा शब्द आणि ही परिस्थिती. मा.आयुक्त महोदय, तुम्ही माझ्या वॉर्डामध्ये या आणि बघा ठाणे महानगरपालिकेला जे गौरव जे पुरस्कार मिळतात, एखादया पुरस्काराला जर आम्ही विरोध केला तर ते आपल्या ठाण्याच्या हिशोबाने आपल्या मान सन्मानाच्या हिशोबाने शोभणारे नाही. पण आपण जेंव्हा पुरस्कार घेतो तेंव्हा ठाण्याच्या एका बाजूला रस्ता नाही, गटार नाही, पायवाटा नाही हे ही आपल्या लक्षात असणे गरजेचे आहे. मा.महापौर महोदय, आपण आमच्या भागात येऊन गेला आहात. या सभागृहाचे आपण पिठासीन अधिकारी आहात मा.आयुक्तांच्या वर तुमचाच आदेश असेल. माझी पुढच्या महासभेला लक्षवेधी आहेच पण मी आपणांस विनंती करतो की, माझ्या ग्रामस्थांची कळकळीची विनंती आहे की, तुम्ही अनधिकृतरित्या जे डंपिंग चालू केले आहे ते कृपा करुन बंद करावा. आणि त्या लोकांच्या भावनांचा विचार करुन त्या लोकांच्या समोर जाऊन ज्या काही त्यांच्या मागण्या होत्या ज्या मागण्यासाठी ते रस्त्यावर उतरले होते. त्याच्यासमोर आपण सहकार्याच्या भावनेने जा. आपण आदरणीय आहात. आणि हा विषय देखिल आपण आदरणीय प्रमाणेच कराल अशी अपेक्षा ठेवतो कारण आपण एकदा बोलल्यानंतर पुढे कोणीच नाही. मी मा.आयुक्त साहेबांशी देखिल चर्चा केली आहे. आपण प्रशासनाला जर एखादा आदेश दिला तर तुमचा आदेश मोडण्याची प्रशासनाची हिम्मत नाही. आपल्याकडे डंपिंग ग्राऊंडसाठी जागा नसेल किंवा आरक्षण नसेल तर ती आपल्यासाठी शरमेची गोष्ट आहे. आमच्या बंधू-भगिनींचे काय चुकतंय? आमच्या भागातील जनतेला मलेरिया-डेंग्यू नाही नाही त्या बिमारी झालेल्या आहेत. आमच्या रोडने जाताना त्या रोडला लाईट नाहीत. सतत दोन-तीन वर्ष मी त्या विद्युत विभागात पाठपुरावा करतोय. विद्युत विभागचे गुप्ता साहेब काय बोलतात ते समजत नाही. कुठला विषय कुठे नेतात ते काहीही समजत नाही. मा. महापौर महोदय, त्या लोकांना आपण का लाईट देऊ शकत नाही? मा.आयुक्त साहेब, आपण लाईट देऊ शकत नाही? गुप्ता साहेब, सांगतात फाईल तयार आहे. पण त्या फाईलवर बजेट कधी पडणार? प्रत्येक वर्षी बघतो तर स्पील ओव्हर. साहेब, आमच्याकडे कामंच झाली नाही तर स्पील ओव्हर येतो कुठून?

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

मा.महापौर महोदय, मी आपणांस विनंती करतो की, जनता आमच्या सारख्या सामान्य माणसाना निवडून देतात. तेंव्हा त्यांचे विचार त्यांच्या भावना आपल्यापर्यंत पोहचविण्याचे काम आम्ही करतो. आम्ही त्यांचे माध्यम आहोत. याच्या पुढे त्यांचे काम करायचे की नाही करायचे, चांगले झाले तर मा.महापौर जबाबदार असतो आणि वाईट झाले तर महापौर असतो. पण दुर्दैवाने सांगायचे झाले तर आमच्याकडे वाईटच झाले आहे चांगले झालेच नाही. मा.महापौर महोदय, विषय चांगला होता. ठाणे महापालिकेची वसूल होणे अत्यंत जरुरी आहे. पण खर्चाची बाब आणि तिथे खर्च आवश्यक आहे लाईट, पाणी, गटर, रस्ते हे होणे गरजेचे आहे. मा.महापौर महोदय, मा.आयुक्त साहेब मी आशा करतो की,आपण माझ्या प्रभागात या. माझ्ञ महापौरांना या विषय चांगले ज्ञात आहेच तिथली वस्तूस्थिती कशी आहे. आपण आमच्याकडे या आणि माझ्या प्रभागात जास्तीत जास्त कामे करा अशी मी आपणांस विनंती करतो. मा.महापौर महोदय, आपण महाराष्ट्र शासनाला एक निवेदन दया. आपल्या आधी इथे मा. श्री. भोगे साहेब आयुक्त होते. त्यावेळे पासून ग्रामीण भागासाठी अविकासीत भाग म्हणून निधी ठेवलेली होती. पण आजच्या स्थितीला ती निधी पूर्णपणे बंद केलेली आहे. परंतू त्या भागाचा पूर्णपणे विकास झाला असेल आणि ती निधी आपण बंद केली असेल तर आमची काहीही हरकत नाही. पण आपण एकदा येऊन बघा की विकास झाला आहे की नाही. आणि अशा कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडून जास्तीत जास्त निधी आणावी आणि माझ्या प्रभागातील जास्तीत जास्त कामं करावी. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पुरे करतो. धन्यवाद. जयहिंद , जय महाराष्ट्र.

**श्री. संजय भोईर :-**

मा. महापौर महोदय, सन्मा. श्री. संजय घाडीगांवकर आणि सन्मा. श्री. मजोन शिंदे हयांनी जी लक्षवेधी हया ठिकाणी मांडलेली आहे. तिला अनुमोदन देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. ठाणे महानगरपालिका डबघाईला जबाबदार कोण? या संदर्भातील पार्श्वभूमी बघितली तर हया लक्षवेधीमध्ये ज्या ज्या गोष्टी दाखवल्या आहेत ती वस्तुस्थिती नाकारता येत नाही. सन्मा.सदस्य श्री. विक्रांत चव्हाण हयांनी त्यांचे म्हणणे मांडले. वास्तविक सगळे नगरसेवक त्यांच्याकडे क्लाससाठी गेले तरी हरकत नाही. कारण त्यांनी सर्व माहिती हया ठिकाणी मांडलेली आहे. मा.महापौरांनी ही त्यांचा सल्ला घ्यावा. मा. महापौरांना त्यांनी विनंती केली आहेच की, ज्या-ज्या गोष्टी चर्चेला येतील त्यावेळी मला बोलवावे. मा.आयुक्त साहेब आहेतच. जी माहिती हया ठिकाणी आपल्याला सांगितलेली आहे की, ठाणे महापालिका डबघाईला आली. त्याबाबत वस्तुस्थिती आपण बघितली तर ज्यावेळी आपल्याकडे जकात होती आणि त्यातून मिळणा-या उत्पन्नातून महापालिका चालविली जात होती आणि ज्या पध्दतीने चालवली जात होती. वास्तविक पाहता, जकात बंद करण्याच्या संदर्भातील जो निर्णय शासनाने ज्या वेळेस कळवला आणि आपल्याला समजले की, जकात बंद होणार आहे आणि एलबीटी सुरु होणार आहे. आपल्या बाजूलाच मुंबई महानगरपालिका आहे. मुंबई महापालिकेच्या आयुक्तांनी शासनाला कळविले की, आम्हाला एलबीटी आणायची असेल तर त्या संदर्भात आम्हाला संपूर्ण अभ्यास करायचा आहे आणि त्यासाठी आम्हाला थोडासा वेळ दयावा. हा अभ्यास करण्यासाठी मुंबई महापालिकेला शासन सहा महिने देऊ शकते तर ठाणे महापालिकेने एवढी घाई का केली? ठाणे महापालिकेने एलबीटी लवकर कशी येईल आणि जकात लवकर कशी जाईल आपले अधिकारी आहेत ते अतिशय हुशार आहेत. साहेब, आम्ही त्यावेळी महासभेमध्ये विनंती केली होती की, सहा महिने आपण प्रायव्हेट ठेकेदाराला जकात वसुल करण्यासाठी दयावी. सन्मा.नरेश म्हस्के साहेब, त्यावेळी कोर्टात गेले होते की, आमच्याकडे जकात रहावी. परंतू आपल्याकडे जकात बंद झाली आणि आता संजय घाडीगांवकरांनी सांगितल्याप्रमाणे महापालिका डबघाईला गेली. मा.महापौर महोदय, अशी परिस्थिती आपण आपल्या अंगावर का ओढावून घेतली? अर्थसंकल्पाची बाब असेल ज्यावेळी आपण २२०० कोटी दाखवतो. सनम.सदस्य श्री. विक्रांत चव्हाण यांनी सांगितले की, आपल्याकडे ७००-८०० कोटी रुपये बजेट फुगवून दाखवतात. आम्ही या ठिकाणी वेगवेगळया भागातून निवडून आलो आहोत. आमच्या सारख्या नगरसेवकांनी आश्वासन दिली असतील त्यामुळे त्या नगरसेवकांना तो निधी तात्काळ उपलब्ध करुन दयावा. प्रत्येक नगरसेवक आप-आपली कामे बजेटच्या वेळी घेऊन येतो. त्यावेळेस हा बजेट त्यावेळी फुगले जाते आणि त्यामुळे स्पील ओव्हर वगैरे हया बाकीच्या गोष्टी दाखविल्या जातात. मा.महापौर महोदय, आपण जर एलबीटीच्या माध्यमातून विचार केला तर आपल्याकडे एलबीटी वसूल होत

-महापौर
ठाणे महानगरपालिका

नाही तर ती का वसूल होत नाही. तर त्याची कारणे शोधणे गरजेचे आहे. काल व्यापा-याच्या मिटींगमध्ये मी स्वत: बसलो होतो. मा.महापौर महोदय त्यावेळी होते. त्यांनी संपूर्ण सारांश घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी व्यापा-यांनीच सांगितले की, एलबीटी बंद होणार आहे आणि दुसरा एक कर येईल. आम्ही सांगितले की, १०८ कोटी वसूली कमी झालेली आहे हे १०८ कोटी रुपये आपण कुठून भरुन काढणार आहोत. आम्ही व्यापा-यांना विनंती केली की, ज्यांनी एलबीटी भरली नसेल, जे छोटे छोटे व्यापारी आहेत त्यांनी एलबीटी भरली पाहिजे. वास्तूविक पाहता, एलबीटी सुरु करण्यापूर्वी आपण त्यासंदर्भात अभ्यास केलाच नाही किंवा अभ्यास अपूर्ण झाला आहे आणि हा अभ्यास केंव्हा पूर्ण होणार आहे? एलबीटी गेल्यावर पूर्ण होणार आहे का? आजची परिस्थिती आपल्यावर आली नसती. मा. महापौर महोदय, नविन सरकार आलेले आहे आणि हया नविन सरकाने यापूर्वी आश्वासन दिले आहे की, आमचे सरकार आल्यावर एलबीटी रद्द केली जाईल. मा.महापौर महोदय, एलबीटी गेल्यावर आपल्याकडे विकासाची कामे कशी काय होणार आहेत? आपल्याला जर रस्ते विकसित करायचे असतील तर आपल्याकडे निधी असणे गरजेचे आहे. आपण सर्वांनी रस्त्यांची कामे सुचवली आहेत आणि ती करण्यासाठी आपल्याला अडीचशे तीनशे किंवा पाचशे कोटी रुपये खर्च येणार आहे तो खर्च आपण कुठून आणणार आहोत? आणि हे रस्ते कसे होणार आहेत. आपल्याकडे काही सदस्य नविन सदस्य निवडून आले आहेत आता तीन वर्ष झाल्यानंतर प्रत्येकाची अपेक्षा आणि इच्छा असते आणि त्यांना निवडून दिलेल्या नागरिकांची इच्छा असते की, ज्या नगरसेवकांना आपण निवडून दिले आहे त्यांनी लाईट असो, पाण्याची समस्या असो किंवा आपल्या भागातील एक चांगले हॉस्पीटल असेल किंवा एखादी चांगली वास्तू तयार होईल. हयासाठी आपल्याला जो पैसा लागणार आहे तो पैसा आपण कुठून आणणार आहोत? आणि आपल्याकडे पैसा नसेल तर आपण काय डेव्हलपमेंट करणार आहोत? त्या नगरसेवकांनी त्यांना निवडून दिलेल्या नागरिकांच्या शिव्या खायच्या का? आम्हाला निवडून दिलेले नागरिक आम्हाला सोडणार नाही. नागरिक त्यांच्या दारावरुन जाताना किंवा रस्त्यावरुन जाताना आम्हाला जाब विचारण्याच प्रयत्न करतो की, आम्ही तुम्हाला निवडून दिले आहे आमचा रस्ता का झाला नाही किंवा आमच्या भागाचा विकास का झाला नाही? मा.महापौर महोदय, आम्ही स्लम भागातून निवडून आलो आहोत. मनोरमानगर असो, आझादनगर असो, मानपाडा असेल किंवा त्या भागातील संपूर्ण घोडबंदर किंवा ठाणे शहरामध्ये असणारा स्लम भाग असेल या भागातील नागरिक अतिशय जागरुक असतात की, नगरसेवकांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कामं झाली आहेत की, नाहीत? भले आम्ही त्या ठिकाणी चार-चार वेळा निवडून आलो असू. पण त्या ठिकाणीच्या काय व्यथा असतात त्या आपल्या सगळयांना माहिती आहेत. मा.महापौर महोदय, आपली एलबीटीची वसूली उद्दिष्टाप्रमाणे वसूल होते की, नाही, आपल्या केंद्र शासन किंवा राज्य शासनामार्फत जेएनएनयुआएम अंतर्गत जी निधी आपल्याला येणार आहे ती निधी तो निधी आता थांबण्याचा प्रयत्न त्या ठिकाणी होईल. आज ज्या प्रमाणांत एलबीटी वसूल होणे अपेक्षित आहे ती तशी वसूल होताना दिसत नाही. व्यापारी हात वर करुन मोकळे झालेत. मघाशी टीव्हीवर मी बघितले एकनाथ खडसे साहेबांनी सांगितले की, एलबीटी संदर्भात मार्च अखेर निर्णय घेतला जाईल अशाप्रकारे भाष्य केले. एलबीटी मार्च अखेरपर्यंत चालू राहणार असेल तर आपण आतापासून आपली कंबर खचली पाहिजे. शासन जर आपल्याला सांगत असेल की, व्यापा-यांना त्रास दयायचा नाही, रेट करायचा नाही तर आपली वसूली कशी होईल? वसूली झाली नाही तर डेव्हलपमेंट कशी होईल? अशाप्रकार काम करण्याची पध्दत आपल्याला बदली करावी लागेल. मार्चपासून एलबीटी जाणार आहे तर आपण आतापासून वसूली का करु नये? मा. महापौर महोदय, काही लोकांनी आपल्याकडे अजून नोंदणी केलेली नाही. नोंदणी का केली नाही तर एलबीटी जाणारआहे, व्यापा-यांची संघटना मोठी आहे आणि हया संघटनेबरोबर ठाणे महापालिका जर चालत असेल तर ते चुकीचे ठरेल. काही व्यापारी संघटना सांगते म्हणून एलबीटी भरत नाही. १०८ कोटीची तूट जी आपल्याला भरुन काढायची असेल तर आजपासून वसूलीला सुरुवात करावी लागेल आणि वसूली झाली तर नगरसेवक त्यांच्या प्रभागाचा आणि ठाणे महापालिका संपूर्ण शहराचा विकास करु शकेल.

मालमत्ता कर :-

मा.महापौर महोदय, मालमत्ता करा संदर्भात बघायचे झाले तर स्लम भागात ब-याच ठिकाणी डबल-डबल घरे झालेली आहेत. काही ठिकाणी टॅक्स लागला आहे आणि काही ठिकाणी टॅक्स लागला जात नाही किंवा आपले अधिकारी लावत नाहीत. मा.आयुक्त साहेबांनी त्या ठिकाणी थोडसं लक्ष

-महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

मा.महापौर महोदय, आमच्याकडे इंडस्टीयल झोन होता. कलरकेम कंपनी, बायर इंडिया कंपनी, सॅण्डोज कंपनी असेल, निकोलेस, किरणमील कंपनी असेल त्या कंपन्यामध्ये आमच्या लोकांना रोजगार मिळत होता त्यांचे घर व्यवस्थीत चालत होते. मा. महापौर महोदय, आजच्या स्थितीला हया सर्वच कंपन्या बंद झाल्या आहेत. हया कंपन्या बंद होण्याचे कारण काय? मा.महापौर महोदय, ज्या वेळी आपल्याकडे जकात होती त्या जकातीमध्ये हया कंपन्याना सवलती दयायला पाहिजे होत्या म्हणजे हया कंपन्या आपल्या शहरात राहिल्या असत्या आणि स्थानिक लोकांना त्यांचा रोजगार मिळत होता, रोजगार मिळत होता. परंतू आता कंपन्या बंद झाल्यामुळे त्या ठिकाणची लोक वॉचमनची नोकरी करत आहेत. काही लोक गोडाऊनला काम करत आहेत. कंपन्या बंद झाल्यामुळे लोकांची अतिशय वाईट परिस्थिती आहे. आम्ही कंपन्यांना आमच्या जागा दिलेल्या आहेत. त्यावेळी महाराष्ट्र शासनाने आमच्या जागा ऍक्वायर करुन घेतल्या होत्या. हया ऍक्वायर केलेल्या जागेमध्ये थोडाफार बदल करायचा असेल तर वास्तविक पाहता ती जागा शासनाने कंपनीला उद्योगासाठी दिलेली होती. आजही आमच्या शेतक-यांची नांवे त्या सातबारावर आहेत असे असताना कंपनीची एक जागा मला विकली गेली, एक जागा दुस-याला विकली गेली. अशाप्रकारे जो बदल त्या ठिकाणी केला तो बदल केल्यानंतर आय टू आर करण्याची जी प्रोसिजन होती. मा.आयुक्तां त्याचे अधिकार आहेत. परंतू हे आय टू आर करत असताना आमची लोक बेघर झाली. त्याकडे कोणीही लक्ष देत नाही. बिल्डरांनी जागा विकत घेतल्या त्यातून आपल्याला कर रुपाने महसूल मिळतो. काही कंपन्यावर थकबाकी आहे त्यासाठी आपण लिलाव प्रोसिजरमध्ये जातो. मग ते लोक कोर्टात जातात. त्यामुळे थकबाकीचे आकडे फुगलेले दिसतात. आपले कर्मचारी वसूलसाठी जातात तेंव्हा त्यांना कोर्टाच्या ऑर्डर दाखवल्या जातात. त्यामध्ये आपण आपली वसूली कशी काय करणार? मालमत्ता वसूलीबाबत जी गोष्ट सांगितली आहे त्याबाब सुध्दा बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच आमच्या राहत्या घरांना दुरुस्ती परवानगी देताना कायदयाच्या चौकटीमध्ये आम्हाला बसवून आमच्या घरांना बांधण्याची परवानगी दिलीतर शहर विकास विभागाला चांगल्या प्रकारे महसूल मिळून शहर विकास विभागाचा भरणा चांगल्याप्रकारे होऊ शकतो.

म.महापौर महोदय, परिवहन विभागाच्या संदर्भात जर आपण विषय घेतला तर, आपल्या ज्या पूर्वीच्या बसेस आहेत. परिवहन सेवा ही आपण स्वतंत्ररित्या महापालिकेमध्ये सुरु केली आहे. आज त्या परिवहन सेवेकडे बघितले तर बेस्ट आणि नवी मुंबईच्या बस आपण बघितल्या आणि आपल्या बस बघितल्या तर बेस्टच्या बसेस रोजच्या रोज साफ केल्या जातात. आपल्या बस पाहिली तर ती किती घाण असते. आपल्या बसला पॅच मारलेला असतो, ठिक-ठिकाणी तिचा रंग निघालेला असतो. आपल्या बसमध्ये बसायचे की, नाही हया विचार लोक करतात. मा.महापौर महोदय, मी गेल्या पंधरा दिवसांपासून परिवहन सेवेचे निरिक्षण करत आहे. आमच्या भागातील लोकवस्ती आणि त्याप्रमाणे बस फे-या असणे अपेक्षित आहे आणि आमच्या प्रवासांनी त्या बसमधून ये-जा करावी आणि परिवहन सेवेचे उत्पन्न वाढावे हा आमचा हेतू आहे. आपल्या परिवहन सेवेच्या ऑफिसमध्ये गेलो असता , त्या ठिकाणी जो अधिकारी वर्ग आहे ते अधिकारी वर्ग तुम्हाला ए.सी.मध्ये बसलेले दिसतात. परिवहनच्या अधिकारी वर्गाने रोडवरउतरुन काम करण्याचा प्रयत्न केला तर आपली परिवहन सेवा व्यवस्थीतपणे चालू शकेल. जर आपण विचार केला की, आपल्याला परिवहन सेवा डबघाईलाच आणायची आहे. जसे संजय घाडीगांवकरांनी सांगितले ठाणे महापालिका डबघाईला आली आहे. मा.आयुक्त साहेबांनी स्वतःहून परिवहन सेवा सुधारण्यासाठी इंटरेस्ट दाखविला आहे की, परिवहन सेवा आपण सुधारु शकतो. आपल्याकडे जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून ए.सी. ४५ बसेस अशा २०० ते २५० बसेस येणार आहेत. मा.महापौर महोदय, जर आपण कोलशेत, बाळकून, किंवा गायमुख भागात एखादी बस फेरी पाठवली. मागे आपण भंगारचे एक टेंडर काढले होते. हया भंगारच्या बाबतीत आपण विचार केला तर किती चांगल्या किंवा खराब गाडया त्या भंगारमध्ये असतात. मा.महापौर महोदय, माझ्या शंभर गाडया आहेत. मी त्या गाडयांच्या स्पेअर पार्टसूवर नेहमीचे लक्ष देत असतो. त्यामुळे मी परिवहन सेवेचा विचार करतो. आपली ही परिवहन सेवा व्यवस्थीत चालली पाहिजे. परिवहन सेवेची बस व्यवस्थीत चालली पाहिजे. आज आपण चांगली गाडी भंगारला काढू शकतो. मा.महापौर महोदय, बॉम्बे वायर कंपनीची जागा आपण परिवहनच्या डेपोसाठी घेतलेली आहे. मा.आयुक्त साहेब, मा.जिल्हाधिकारी यांनी ती जागा आपल्या ताब्यात दिली. त्यानंतर अडीच ते तीन कोटी रुपये आपण त्याच्या संरक्षण भिंतीसाठी खर्च केला आहे. तो खर्च कुठे गेला? तो डेपो कुठे गेला?

-महापौर
ठाणे महा... ...लिका ठाणे.

एकात्मिक नाले :-

जर आपण नाले विकसित करायला घेतले तर काही बिल्डरच्या ५०-१०० एकर जागा आहेत. त्या भागातून पूर्वीपासून नाले वाहतात. पण त्या नाल्यांच्या नैसर्गिक प्रवाह फिरविण्याचा प्रयत्न होतो. आजच्या घडीला किती टक्के नाले विकसित झालेले आहेत. आमच्या भागात ठेकेदाराने नाले विकसित करण्याचे काम अर्धवट ठेवलेले आहे. आमच्या भागात नळपाडयातून जो नाला येतो जो भुयाळ इस्टेटमध्ये आहे तो नाला आम्ही मा.पाटील साहेब, महापौर असताना मंजूर केला होता. परंतू त्या नाल्याचे अद्याप काम झालेले नाही. मध्यतरीच्या काळात गांधीनगर-सुभाषनगर येथून एक मुलगा मोटर सायकल आला. मध्ये मुंबई महापालिकेची पाईप लाईन आहे. तिथे त्यांनी जे कल्व्हर्ट बनविले आहेत ते आता जुने झालेले आहेत. तिथे रुळ टाकलेले आहेत तिच्यावरुन त्यांची मेंटनन्सची गाडी जात होती. ते आता बंद झालेले आहेत. ते बंद झाल्यामुळे त्या कल्व्हर्ट वरुन तो मुलगा पडला आणि त्या ठिकाणी मरण पावला. अशाप्रकारे दोन- तीन अपघात त्या ठिकाणी झालेले आहेत. मा.महापौर महोदय, हे नाले आपण का करत नाही? ही केंद्र शासनाची योजना आहे आणि केंद्र शासनाच्या योजनेचे ज्यावेळेस आपण प्लॅनिंग करतो त्यावेळी १,२,३ नंबर असे आपण नाल्यांना नंबर दिले होते. त्यापैकी अर्धेच नाले का बनविले कोणाची दुश्मनी आहे म्हणून ते नाले तेवढेच ठेवलेले आहेत. ब्रिज खालून गेलेला आहे. कापूरबावडी आशापुरा मातेचे मंदिर आहे. माझ्या माहितीनुसार ५०० ते ६०० मीटरचा नाला त्या ठिकाणी राहिला असेल लोक तिथे राहतात. पावसाळयात येऊरवरुन येणारे जे पाणी आहे त्याचा प्रवाह जास्त प्रमाणांत असतो. त्यामुळे नाल्याच्या आजूबाजूला राहणा-या लोकांच्या घरामध्ये पाणी शिरते. ते पाणी आम्ही त्या ठिकाणी जाऊन मदतकार्य करुन काढतो. पण प्रत्येक वर्षी लोकांची समजूत किती काढणार? केंद्र शासनाचा निधी आपण नाले बांधण्यासाठी आणतो पण ते काम आपण करतो की, नाही. लाला साहेब होते किती काम झाले? सर्वच गोष्टी आपण दाखवतो. पण ही कामे आपण करणे गरजेचे आहे. केंद्र शासनाचे, बीएसयूपीचे पैसे येतात ते पैसे आपण इतरत्र फिरविण्याचा प्रयत्न करतो. पण बीएसयूपीचा आपण जर विचार केला तर आपण ज्या बिल्डींग बनवायला पाहिजे त्यापैकी किती टक्के बिल्डींग तयार झालेल्या आहेत, कशाप्रकारे तयार झालेल्या आहेत त्यापेक्षाही चांगली घरं आपण त्यांना देऊ शकतो. कारण रस्ता रुंदीकरणा कामी किंवा एखादया ठिकाणचा स्लम एरिया विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून बीएसयूपी वापरण्याचा प्रयत्न झालेला आहे. केंद्र आणि राज्य शासनाकडून आपल्याला जो निधीअलब्ध होतो तो कशाप्रकारे वापरला जातो याकडे मा.आयुक्तांनी लक्ष दिल्यास आपण ठाणे शहर चांगल्याप्रकारे विकसित करु शकतो. याबाबत आपल्याला श्री. विक्रांत चव्हाण यांनी माहिती दिलेली आहे. आम्ही देखिल श्री. विक्रांत चव्हाण हयांच्याकडून मार्गदर्शन घेऊ. आम्ही चार वेळा निवडून आलो तरी त्यांच्याकडून ज्ञान घेण्याचा प्रयत्न करतो. मा.महापौरांनी सुध्दा घ्यावा आणि चार्ज व्हावे. कारण आपल्याला जर हया ठाणे शहराचा विकास करायचा असेल तर आपण चांगल्या योजना हया ठिकाणी आणाव्यात आणि हया संपूर्ण ठाणे शहराचा विकास करावा. सन्मा. सदस्य श्री. संजय घाडीगांवकर आणि श्री. मनोज शिंदे हयांनी लक्षवेधी मांडून सर्वांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. कारण आज खरोखर ती परिस्थिती आहे की, येणा-या काळामध्ये आपण ठाणे शहराची डेव्हलपमेंट करु शकतो की, नाही किंवा जे नविन सदस्य निवडून आले आहेत ते त्यांच्या भागात डेव्हलपमेंट करु शकतात की, नाही? कारण आपण नगरसेवक निधी किंवा मागासवर्गीय निधी दिल्या आहेत. तेवढया निधीतून डेव्हलपमेंट करु शकत नाही. ठिक ठिकाणी जुनी गटारे आहेः काही ठिकाणी खुली गटारं आहेत. जुनी गटारं बांधण्यासाठी आपल्याकडे पैसे नाहीत किंवा एखादया शौचालयाचा दरवाला,कडी-कोयंडा लावायचा असेल तर त्यासाठी निधी नसतो. तरी आम्हा सर्व नगरसेवकांना न्याय देण्यासाठी आम्ही जे जे प्रस्ताव आपल्यासमोर सादर केलेले आहेत त्यासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यास सांगितले आहे. मा. महापौर महोदय, १३० नगरसेवक निवडून आलले आहेत. त्यातील सर्वच चेहरे आपल्याला परत दिसावेत यासाठी आम्ही जी कामं सुचवली आहेत ती कामं केल्यानंतर आम्ही लोकांसमोर जाऊ शकतो की, आम्ही तुम्हाला ही कमिटमेंट दिली होती ती आम्ही पूर्ण केली आहे. आम्ही दिलेले कमिटमेंट पूर्ण केल्यानंतर आम्ही जेंव्हा त्यांच्याकडे पुन्हा मत मागण्यासाठी जाऊ त्यावेळी लोक आम्हाला सांगतील तुम्ही चांगली कामं केलेली आहेत. म्हणून आम्ही जी आश्वासन दिलेली आहेत ती पूर्ण करण्याच्या संदर्भातील सर्वच गोष्टी लक्षात घेऊन, हया लक्षवेधीच्या माध्यमातून आम्ही या ठिकाणी चर्चा केली आहे. मला हया लक्षवेधीवर बोलण्याची संधी दिल्याबद्दल तुमचे धन्यवाद मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद-जय महाराष्ट्र.

महापौर
ठाणे.

**श्री. संतोष वडवले :-**

मा.महापौर महोदय, सन्मा.सदस्य श्री. संजय घाडीगांवकर आणि सन्मा.सदस्य श्री. मनोज शिंदे हयांनी जी लक्षवेधी मांडली त्या लक्षवेधीवर गेले दोन दिवस या सभागृहात चर्चा चालू आहे. ब-याचशा सन्मा. सदस्यांनी हया लक्षवेधीवर चर्चा केलेली आहे. मा.महपौर महोदय, हया चर्चेचे स्वरुप जर बघितले तर माझे हया प्रशासनाला सांगणे आहे की, आपले जे बजेट झाले त्यावेळी सन्मा.सदस्यांनी जी भाषणं केली आहेत त्याचे जर इतिवृत्त काढले तर संपूणै जमेचे आणि खर्चाच्या ज्या बाजू आहेत त्या आपल्याला माहिती होतील. मा.महापौर महोदय, ठाणे महापालिका डबघाईला याला जबाबदार कोण? हया विषयावर लक्षेवधी मांडली आहे. मा.महापौर महोदय, ज्यावेळी एलबीटी चालू करायची होती. त्यापूवी आपल्या प्रशासनाने कोणत्याही प्रकारचे नियोजन केले नव्हते. जर आपण पूर्वीच नियोजन केले असते तर आपले एलबीटीचे उत्पन्न निश्चितच वाढले असते. आपण व्यापा-यांना जर वेळीच माहिती दिली असती तर आपलेउत्पन्न नक्की वाढले असते. त्यासाठी कुठेतरी कमी पडलो हे प्रशासनाला नाकारता येणार नाही. सन्मा. सदस्य, श्री. विक्रांत चव्हाण हयांनी सांगितले की, एलबीटी संदर्भात आपली कुठलीही नियमावली नाही. मा.आयुक्त महोदय, आपली जर नियमावली असती तर आपल्यावर ही वेळ आली नसती. व्याप-यांकडून वसूली करण्यासाठी आपला कुठलाही अधिकारी जात नाही. आज बरेचसे व्यापारी एलबीटी भरल्याशिवाय बसलेले आहेत. कारण त्यांना कळले आहे की, शासन एलबीटी रद्द करणार आहे. पण तशी वस्तुस्थिती नाही. आपण जर त्यांच्याकडे गेलो आणि त्यांना जर व्यवस्थीत परिस्थिती समजावून सांगितली तर व्यापारी निश्चितच एलबीटी भरतील. परंतू आपला अधिकारी त्यांच्याकडे जात नाही. आपले अधिकारी एकदम स्थूल झालेले आहेत. त्यांच्याकडे एलबीटी संदर्भात कोणत्याही आययोजना नाहीत. सन्मा. सदस्य श्री. पाटणकर साहेबांनी सांगितले की, बजेट पडलेले आहे. खर्च टाकून झालेला आहे आणि बिले ही निघालेली आहेत. पाटणकर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे खरोखर बघण्याची गरज आहे.

मा.महापौर महोदय, मालमत्ता कराची बरीचशी प्रकरणे पेडींग आहेत. कुठलाही अधिकारी ती प्रकरणे तडीस जाण्यासाठी प्रयत्न करत नाही. एकेका अधिका-याकडे दोन-दोन प्रभाग समितीचा चार्ज आहे. त्यामुळे त्यांना हे ही करता येत नाही आणि ते ही करता येत नाही. मा.महापौर महोदय, मालमत्ता करासंदर्भात जी जी प्रकरणे पेडींग आहेत की ज्यांनी कर आकरणी करण्याबाबत महापालिकेकडे अर्ज केलेले आहेत किंवा नळ कनेक्शन संदर्भात कुटूंब संख्या कमी करण्यासंदर्भात ज्यांनी अर्ज केले आहेत. आज पाच-पाच वर्ष झाली परंतू त्यांची कुटूंब संख्या कमी होत नाही आणि ज्यांनी वेगळे कनेक्शन घेतले आहे त्यांनाही बिल येतं आणि इकडेही बिल येत. त्यामुळे काय झाले आहे लोक बिल भरत नाही. ज्याला चार कुटूंबाचे बिल येते म्हणून त्यांनी वेगळे-वेगळे केले आहे. पण चार कुटूंबाची संख्या कमी न करता आज त्यांनी आपल्याकडे अर्ज केलेले आहेत. त्याप्रमाणे कुटूंब संख्या कमी केली तर आपली वसूली होईल. तसेच टॅक्सची बिले लागलेली आहेत. काही लोकांना डबल आकारणी झालेली आहे. त्यांनाजर कमी केले तर लगेच बिले भरुन होतील.

शहर विकास विभागाकडून ब-याचशा गृहसंकूलांनी ओ.सी. न घेता त्यांना पाण्याची बिले अदा करण्यांत आलेली आहेत. मला वाटते आपल्या नियमावलीमध्ये त्यांना दिडपट आकरणी करावी असा नियम आहे. पण ब-याच गृहसंकूलांना सिंगल दराने आकरणी करण्यात आली आहे. आर्कीटेक्टच्या मर्जीनुसार आपण सिंगल बिले दिलेली आहेत. मा.आयुक्त महोदय, त्यांच्यावर कारवाई व्हायलाच पाहिजे. कारण माझ्याकडे त्यांनी पूर्ण माहिती आहे. पाहिजे तर मी तुम्हाला ती देऊ शकतो. साहेब, त्या अधिका-यांवर ठोस कारवाई व्हायला पाहिजे. त्यांनी महापालिकेचे उत्पन्न बुडविले आहे. आज कितीतरी वर्ष त्या गृहसंकूलांना दिड पट बील दयायला पाहिजे ते एक पट पाण्याची बिल दिले जात आहे. मी तुम्हाला त्या गृहसंकूलाची संपूर्ण माहिती देतो. माझ्याकडे संपूर्ण संच आहे अशी बरीचशी गृहसंकूल आहेत. तसेच काहींनी इमारतीच्या तळघरामध्ये पार्किंग असते तिथे रॅम्पची व्यवस्था करणे गरजेचे आहे. परंतू फायरब्रिगेडची एनओसी घेताना काही बिल्डींगला तळघरात रॅम्पची व्यवस्था नाही. मा.महापौर महोदय, त्यांच्यावर देखिल दंडात्मक कारवाई करायला पाहिजे. साहेब, आपल्या नियमावलीमध्ये पार्किंग व्यवस्थेत रॅम्पची व्यवस्था करणे गरजेचे आहे. पुष्कळ ठिकाणी आपण ओ.सी. दिलेली आहे. आयुक्त साहेब, आर्किटेक्ट आणि आपले शहर विकास विभागाचे अधिकारी हयांच्या संगनमताने हे घडलेले आहे. जो

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

आर्किटेक्ट टॉपचा असेल त्याचे काम अगदी फायनल होऊ जाते. त्याला ओ.सी. ची गरज नाही सगळं व्यवस्थीत होऊन जाते. मा.आयुक्त साहेब, हयाबाबत चौकशी करा.

मा.महापौर महोदय, परिवहन सेवेचे नियोजन आपण व्यवस्थीत केले तर परिवहन सेवा डबघाईला जाणार नाही ती व्यवस्थीत चालेल. आपले परिवहन सेवेचे जे अधिकारी आहेत. आता सन्मा.सदस्य, श्री. संजय भोईर हयांनी सांगितल्याप्रमाणेनानकर,नि-हाळी वगैरे हयांना बिनकामाचे कशाला ठेवले आहे, ते काही कामाचे नाहीत त्यांना काढून टाका. सही करुन घरी जातात ते दोन-तीन वाजता येतात. १०-१५ मिनिटं थांबतात परत निघून जातात. त्यांना ५०-६० हजार रुपये पगार कशासाठी दयायचा? साहेब, हे जे अधिकारी आहेत त्यांच्या सेवेसाठी कंडटर, ड्रायव्हर तिथे रुजू आहेत. त्यांना कशासाठी ठेवायचे त्यांना काढून टाका. आपलेउत्पन्न वाढेल.

**मा.आयुक्त सो. :-**

मा.महापौर महोदय, चाळीस लोकांच्या बडतर्फीचा प्रस्ताव तयार आहे.

**मा.सभागृह नेते :-**

साहेब, अधिका-यांच्या बाबतीत विषय चालू आहे. साहेब, तुम्ही फक्त कामगारांबाबत बोलता अधिका-यांवर जात नाही.

**मा.आयुक्त सो. :-**

सर्वांच्यावर जवळ जवळ पाचशे लोक आहेत.

**श्री. संतोष वडवले :-**

मा.आयुक्त महोदय, परिवहन सेवेबाबत जर व्यवस्थीत नियोजन केले तर, आता बुरपुल्ले साहेब आहेत त्यांचे बरेचसे प्रयत्न चालू आहेत.

मा.महापौर महोदय, आपण बरेचसे प्रकल्प हाती घेतलेले त्यासाठी आपण सल्लागार नेमतो. त्या सल्लगारांना आपण कितीतरी फी देत असतो. साहेब, मी माझ्याकडचे एक उदाहरण देतो. साहेब, माझ्या प्रभागात सिवरेजचे लाईन टाकण्याचे काम चालू आहे. त्या सल्लागाराला आपण लाखो रुपये भरलेले आहेत. परंतू माझ्या भागातील काम थांबलेले आहे. का तर त्यांना ७ नंबर पंपिंग स्टेशनला ती लाईन जोडण्यासाठी जागा नाही. साहेब, आपण सल्लागार कशासाठी नेमायचे? त्यांना एवढी फी कशासाठी दयायची? साहेब, नाल्यातून लाईन टाकण्यासाठी आपण सल्लागार नेमले होते?

ब-याचशा गृहसंकूलाकडे एकात्मिक नाले बांधून झाले. परंतू आमच्या प्रभागात झोपडपट्टीमध्ये राहणारी लोक आहेत त्यांच्या जवळून जे नाले जात आहेत त्यांना संरक्षण भिंती बांधलेल्या नाहीत. माझ्याकडचा ५ नंबरचा नाला अर्धवट बांधलेला आहे. जेवढे ठेकेदाराला आणि अधिका-याला सोईस्कर वाटले तेवढेच त्या ठिकाणी काम झालेले आहे. जिथे सोपा भाग होता तेवढेच बांधकाम आयएनडीपीमध्ये झालेले आहे. बाकीचे आयएनडीपीच्या नाल्याचे बांधकाम सोडून दिलेले आहे. साहेब, आपण त्यांना बिलं अदा केली सर्व केल. ते बोलतात काम पूर्ण झाले. मग त्यांनी कुठले नाले घेतले होते, आमचा अर्धा भाग झाला आहे, अर्धा भाग सोडलेला आहे, पुढचा भाग घेतलेला आहे ही कुठली नाले बांधण्याची पध्दत झाली? आयएनडीपीच्या नाल्यांची तुम्ही पूर्ण ड्रॉईंग बनवली होती. आमच्याकडील ५ नंबरचा नाला इंदिरानगरवरुन येतो आणि कोरम वरुन जातो. अर्धा भाग केला आणि अर्धा भाग हयांनी का सोडला? साहेब, नाला बांधणीस लोकांचा विरोध नाही. नाला बांधण्यास सगळे तयार आहेत. जी अतिक्रमणे होती ती आम्ही स्वत: काढून दयायला लावली. नाले बांधणीस आमचा विरोध आहे असे आतापर्यंत कोणीही बोललेले नाही. साहेब, नाला रुंदीकरणास देखिल कोणाचा विरोध नाही. साहेब, आपण आयएनडीपीचे नाले पूर्ण झाले आहेत असा रिपोर्ट सुध्दा पाठवला आहे. ज्यावेळेस आपण डीपीआर बनवला होता तो पूर्ण डीपीआर बनवला होता. दुसरा महत्वाचा विषय असा आहे की, आमचा नगरसेवक निधी, प्रभाग सुधारणा निधी, मागासवर्गीय निधी हयांचे ज्यावेळेस टेंडर झाले त्यावेळेस अबाऊमध्ये टेंडर गेले. साहेब, तुम्ही ते ५% बिलो करायला सांगितले. साहेब, मोठ-मोठे टेंडर आहेत ते ३०-३५ % अबाऊमध्ये घेतलेले आहेत.

महापौर

**श्री. नजीब मुल्ला :-**

साहेब, आपण जेंव्हा प्रशासकिय वित्तीय मान्यता देतो ती त्या रक्कमेला देतो आणि टेंडर त्या रक्कमेपेक्षा कमी येते.

**मा.आयुक्त सो. :-**

जी कॉन्ट्रक्ट अमाऊंट स्थायी समितीने मान्य केलेली आहे.. .. ..

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, प्रस्तावाप्रमाणे पाच-पाच लाखाच्या प्रभाग निहाय फाईल्स बनवाव्यात आणि त्याचे सात दिवसाचे टेंडर काढावे म्हणजे तो विषय संपून जाईल. मग टेंडरमध्ये निविदाप्रक्रिया अडकणार नाही. साहेब, मी प्रभाग सुधारणा निधीचे बोलतोय.

**मा.सभागृह नेते :-**

साहेब, नगरसेवक निधीप्रमाणे त्यांना करु दया.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

साहेब, त्याच्यामध्ये वेळ जाईल.

**मा.सभागृह नेते :-**

साहेब, नगरसेवक निधीचे टेंडर ऑलरेडी निघालेले आहे. नगरसेवक निधीप्रमाणे करु दया.

**मा.महापौर सो. :-**

माझ्या माहितीप्रमाणे त्या टेंडरमध्ये आयटम रेट फायनल केलेले आहेत. मग आयटम रेटप्रमाणे तीच कामं होणार असतील तर काय हरकत आहे?

**सौ. आशा कांबळे :-**

मा.महापौर महोदय, मी जास्त वेळ बोलणार नाही. आताच शिवसेना गटनेते श्री. वडवले साहेबांनी नाल्याच्या स्थितीबाबत सांगितले त्यांचा नाला क्र. ५. माझ्या प्रभाग क्र. २९ मध्ये चार-पाच नाले उगम पावतात. त्यांचे नंबर मला मिळाले तर बरे होईल. कारण गेले पाच-सहा वर्ष मी बोलतेय. मला त्या नाल्याचे क्रमांक सांगा आणि तुमची जी काही यादी आहे त्यामध्ये ते नाले आहे की नाहीत ते सुध्दा सांगा.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

मा.महापौर महोदय, आता नगरसेवक निधीचे जे टेंडर काढलेले आहे. त्या टेंडरमध्ये बांधकाम खात्याशी संबधितच कामं घेतलेली आहेत. नगरसेवकांना त्यांच्या प्रभागात इतर जी कामं करायची आहेत. उ. बगीच्याचे सुशोभिकरण करायचे आहे. पाणी खात्याशी संबधित काम करायचे आहे तर त्या कामांसाठी परत टेंडर काढावी लागणार आहेत. मला एक कळत नाही ते आयटम का घेतले नाहीत. नगरसेवक निधीची टेंडर निघतात तेंव्हा नगरसेवक फक्त बांधकाम खात्याशी संबधित कामं करणार असं समजून नगर अभियंता कसे काय टेंडर काढतात? नगर अभियंता हा संपूर्ण शहराचा आणि सगळया खात्यांच्या असतो. त्याच्यात पाणी, बगीचा, विद्युत वगैरे हे सगळं येत. आयटम रेट घेताना सगळया आयटमचे रेट की घेतले

महापौर
महानगरपालिका ठाणे.

नाही. मला आता माझ्या वॉर्डात जर काही काम करायचे असेल तर परत टेंडर मागविणार मग हया टेंडरचे काय होणार? म्हणजे डोक न वापरता त्यांनी ते टेंडर काढायचे बस. मा.आयुक्तांनी टेंडर काढायला सांगितले आहे टेंडर काढायचे. अशी जर इंजिनिअर्स लोकांची मानसिकता असेल तर आमची कामं होणारच नाहीत.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, ठरावांच्या बाबतीत सुध्दा असेच म्हणणे आहे.

**मा.सभागृह नेते :-**

मा.आयुक्त साहेब, हयामध्ये आपला खर्च वाचणार आहे.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

साहेब, हयासाठी तुम्ही स्पेसिफीक सूचना दिल्या पाहिजेत की, जर अशी कामं आली तर त्या त्या डिपार्टमेंटचे जे रेट आहेत त्यानुसार ती कामं करा. परत टेंडर काढा मग मार्च येणार आमचा निधी लॅप्स होणार.

**मा.आयुक्त सो. :-**

सन्मा.महापौर, मा.सन्मा. सभागृह. आपण जितक्या अमाऊंटचे टेंडर काढले होते. त्याच्यामध्ये दोन गोष्टी होत्या. त्याच्यामध्ये आयटम दिलेले होते आणि टोटल अमाऊंट लिहिली होती की, इतक्या रुपयांपर्यंतचा कॉन्ट्रक्ट देता येईल. आपण जी अमाऊंट दिली होती त्या अमाऊंटमध्ये बदल करता येणार नाही. ठेकेदाराच्या अमाऊंटमध्ये आपल्याला बदल करता येणार नाही. पण प्रॅक्टीकली एक काम करता येईल की, जे काही आयटम त्याच्यामध्ये आहेत. जर तेच काम प्रभाग निधी किंवा दुस-या कोणत्या फंडातून करत असताना तेच जर आयटम असतील तर त्या ठेकेदाराला जी काही टोटल अमाऊंट दिलेली आहे. त्याच्या अंतर्गत आपल्याला हे काम देता येईल आणि याला एखाद महिना लागेल तो पर्यंत जे आयटम टेंडरमध्ये नाहीत त्यांचा आणिउरलेल्या निधीचा एकत्रित टेंडर काढायचे म्हणजे काम थांबणार नाही.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

साहेब, तुम्ही आता म्हणताय ते म्हणणं फार सोप आहे. परंतू तसं ॲक्चूली ठरावित मुदतीत होत नाही. ते टेंडर निघायला फेब्रुवारी शेवटउजाडला तर मग आमची कामं होणार कशी?

**मा.आयुक्त सो. :-**

टेंडरची प्रक्रिया ऑलरेडी सुरु झालेली आहे ती चालू राहू दया. तेव्हा माझ्याकडे नोट ठेवतील. त्या नोटमध्ये जर नगरसेवक निधी लिहिला असेल तरी आयटम तेच असल्यामुळे आणि कॉन्ट्रक्ट टोटल अमाऊंटच्या आत असल्यामुळे त्यांना दुस-या निधीचे पैसे याच ठेकेदाराकडून त्या आयटम रेटने करण्यासाठी माझ्याकडून परवानगी मागतील. मी हो म्हणता आणि माहितीसाठी स्थायी समितीकडे पाठवून देतो. आणि बाकीचे टेंडर जे निघत आहेत त्याच्यामध्ये एखादा आयटम पूर्वी राहून गेला असेल. ते आयटम ॲड करा आणि त्याचा आयटम रेट काढावा.

.. ..

महापौर

**श्री. मिलींद पाटणकर :-**

मा. आयुक्त साहेब, काही काही खात्याचे आयटम घेतलेलेच नाहीत.उदा. गार्डन विभागाचे आयटम घेतलेले नाहीत. विद्युत विभागाचे आयटमच घेतलेले नाहीत.

**मा.आयुक्त सो. :-**

जर आयटम नसतील तर आपल्याला आयटम रेट टेंडर काढावे लागेल.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

साहेब, ते केंव्हा काढणार? मी आधी लक्षवेधीवर बोललो तेंव्हा पण हेच म्हटले की, जो काही आपला स्टाफ आहे, जे काही आपले अधिकारी आहेत. ते कुठल्याही प्रकारचा विचार न करता ठरावित साच्यातून निघाल्यासारखे काम करतात. याबाबत कुठेतरी त्यांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे आणि ती मानसिकता त्यांचे माईंड ॲप्लाय केलं तरच बदलणार आहे नाहीतर नाही. हा विचार त्यांनी आधी पण करायला पाहिजे होता की, हे आयटम आपण घेतले नाही तर काय होईल?

**मा.आयुक्त सो. :-**

सन्मा. महापौर, सन्मा. सभागृह, आम्ही त्यांना आदेश दिले होते नगरसेवक निधीमधून सरासरी जी काही कामं होतात. त्याचे आयटम घेऊन तुम्ही टेंडर काढावे. त्यामध्ये गार्डन विभागाचे काम यापूर्वी कधी नगरसेवक निधीतून झाले नसावे म्हणून त्यांनी ते आयटम आतां टाकले नसावे.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

आयुक्त साहेब, अशी कामे यापूर्वी नगरसेवक निधीतून झालेली आहेत.

**मा.आयुक्त सो. :-**

पण नगरसेवक निधीतून आयटम रेट काढताना सर्व कामं कधीही कोणतेही नगरसेवक किंवा नगरसेविका मागू शकतात. त्याचे आयटम येणे अपेक्षित होते. त्यापैकी समजा गार्डन विभागाचे, विद्युत विभागाचे आयटम आले नसतील तर आता त्यांनी पूर्ण आयटम टाकून, ॲक्चूली जनरली आपण आयटम रेटमध्ये काय करतो पूर्णच्या पूर्ण डीएसआचे सगळे आयटम टाकतो.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

साहेब, यापुढे सगळया अधिका-यांनी त्यांची काम करण्याची पध्दतच बदलली पाहिजे. या सगळया अधिका-यांसाठीच मी बोलतोय की, त्यांची मानसिकता बदलली पाहिजे.

**श्री. बालाजी काकडे :-**

मा.महापौर महोदय, सन्मा. जेष्ठ सदस्यांनी उचललेला मुद्दा रास्त आहे. त्यांनी सगळं टेंडर एकत्रित काढले आहे. आम्हाला नगरसेवक निधीतून वेगवेगळी कामे सुचवायची असतात. पण टेंडरमध्ये फक्त बांधकाम खात्याचे आयटम घेतले आहेत. आम्हाला एखादं काम अर्जंट असेलउदा. शौचालय चोकअप झाले असेल, एखादी पाण्याची लाईन फुटली असेल तर काय? तुम्ही एकत्रित टेंडर काढले आहे. त्यामुळे तुम्ही संबधित इंजिनिअरला सूचना दया नगरसेवक सुचवेल त्याप्रमाणे प्रभागात जे काम असेलउदा. अर्जंट एखादी पाण्याची लाईन टाकायची असेल, एखादया ठिकाणी शौचालय चोकअप झाले असेल, आणि

सचिव
ठाणे महानगरपालिका ठाणे.

नगरसेवकांनी सुचविले तर तशाप्रकारचा प्रस्ताव करुन त्या टेंडरमधून ते काम करुन दयावे अशा सूचना दया.

**श्री. मनोज शिंदे :-**

पाटणकर साहेब, तुम्ही प्रशासनाची बाजू घेताय हे बरोबर नाही.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, मी हा विषय याच्यासाठी काढला होता की, नगरसेवकांची कामे व्हावीत. नगरसेवकांच्या कामांचा अंर्तभाव होण्यासाठी आम्ही हा विषय काढला होता. तर त्याच्यावर चर्चा करावी. प्रशासनाची बाजू कशाला घेता.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

मा.महापौर महोदय, मराठी भाषेमुळे हे असे झाले आहे. हयांना नक्की कळत नाही मी कोणाची बाजू घेतोय.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, आता सन्मा. नजीब मुल्ला आणि मिलींद पाटणकर साहेबांनी जो मुद्दा मांडला त्याबाबत माझे असे म्हणणे होते की, आता प्रभाग विकास निधी आणि नगरसेवक निधीचा विषय चालला होता. आता प्रत्येक प्रभागामध्ये काय गरज आहे, कुठले विभाग आहेत, काम कसे झाले पाहिजे, त्या ठिकाणीच्या नागरिकांची गरज आणि नागरिकांच्या गरजेनुसार त्या-त्या प्रभागाचे नगरसेवक आपली भुमिका मांडत असतात. इथे मात्र फक्त मोजकेच रेट घेतात आणि आम्हाला कामाला लावतात आणि आम्हाला प्रत्येक फाईल फिरवावी लागते. .. ..

**श्री. बालाजी काकडे :-**

मा. महापौर महोदय, आम्ही जी सूचना मांडली ती सूचना ते परत मांडत आहेत. मा.महापौर महोदय, तुम्ही रुलिंग दया.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

मा.महापौर साहेब, आम्ही जे बोललो ते ते बोलत आहेत.

**मा.आयुक्त सो. :-**

सन्मा.महापौर , सन्मा.सभागृह, आपण नगरसेवक निधीसाठी ऑलरेडी टेंडर काढून ठेवले आहे. त्या टेंडरमध्ये एकतर टोटल आमाऊंट दिलेली आहे. त्या अमाऊंटपर्यंत काम करता येते. आणि त्याच्यामध्ये काही डीएसआरचे आयटम दिलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे की, एखादया डीएसआरचे जसे की, विद्युतचे, गार्डनचे काही डीएसआरचे काही आयटम नसण्याची शक्यता आहे. आणि त्याच्यामध्ये तिसरे बंधन असे होते की, तुम्ही नगरसेवक निधीमधून पैसे खर्च करणार. आता नगरसेवक निधीचे असेल तर प्रभाग निधीचे पैसे पण आपण त्याच ठेकेदाराकडून करुन घेऊ शकतो. फक्त त्यांची टोटल अमाऊंट जी आहे ती टोटल अमाऊंट त्यांच्या कॉन्ट्रक्टपर्यंत ठेवावी लागेल. पुढच्या पंधरा-वीस दिवसापर्यंत हा कॉन्ट्रक्ट तुम्ही सगळया निधीसाठी वापरा. त्या आयटमसाठी जे आयटम त्याच्यामध्ये आहेत त्या आयटमसाठी

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

सगळया निधीसाठी वापरा. एक महिन्यामध्ये आपण बाकीचे जे आयटम आहेत ते करु. आणि बाकीचा जो निधी आहे त्याची टोटल अमाऊंट करुन त्याचे टेंडर फायनल करुन घेऊ.

**मा.सभागृह नेते :-**

कॅफो साहेब, तुम्ही ऐकले ना? नाहीतर फाईल्स परत पाठवाल कारण आता तीनच महिने राहिले आहेत.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

साहेब, एका महिन्यात हया सगळया आयटमचे टेंडर फायनल होतील .. ..

**मा.आयुक्त सो. :-**

कारण त्याच्यामध्ये डीएसआरचे आयटम ठेवायचे आहेत. कॉन्टीटीबद्दल म्हणू शकत नाही. फक्त आयटम ठेवायचे आहेत.

**श्री. हरिश्चंद्र पाटील :-**

मा.महापौर महोदय, हयाच्यामध्ये सर्व आयटमचा समावेश झाला पाहिजे अशाप्रकारचे तुम्ही प्रशासनाला निर्देष दया. तुमच्या रुलिंगमध्ये ते आले पाहिजे.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, नगरसेवकांच्या प्रस्तावाप्रमाणे असा त्यामध्ये उल्लेख व्हावा असे लेखी आदेश व्हावेत.

**मा.महापौर सो. :-**

सन्मा.सदस्य, श्री. मिलींद पाटणकर हयांनी जी सुचना केली आहे ती योग्य आहे. प्रशासनाने ज्यावेळी टेंडर काढले त्यावेळेस आयटम रेट आणि त्यामध्ये सर्व डिपार्टमेंटचा डिएसआर रेट असतो त्याप्रमाणे त्यांनी करायला पाहिजे होते. आणि त्यात नमूद करायला पाहिजे होते की, उपलब्ध निधीनुसार आणि स्पेसिपीक नगरसेवक निधी आणि प्रभाग सुधारणा निधी आणि मागासवर्गीय निधी यांचा समावेश करुन घेतला असता आणि ती अमाऊंट फायनल करुन त्या अमाऊंटप्रमाणे केले असते तर अशी अडचण आली नसती. मी प्रशासनाला आदेश देतो की, ही जी काही प्रक्रिया आहे ती फक्त चौदा दिवसांची असावी.

**श्री. हरिश्चंद्र पाटील :-**

मा.महापौर महोदय, चौदा दिवसांची गरज काय आहे. आपल्याला मार्च आगोदर ती निधी वापरायची आहे.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

पाटील साहेब, ते चौदा दिवस आयटमसाठी आहेत.

**मा.महापौर सो. :-**

ठिक आहे, माजी महापौरांच्या म्हणण्यानुसार सात दिवसांची करावी. असे मी प्रशासनालाआदेश देतो.

महापौर

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, आता सात वाजले आहेत. पुढच्या चर्चेसाठी ही लक्षवेधी राखून ठेवावी अशी विनंती आहे.

**श्री. मनोज शिंदे :-**

मा.महापौर महोदय, मला लक्षवेधीवर चर्चा करायची आहे.

**(तद्नंतर मा. महापौर महोदय, सायंकाळी ७.०० वाजता सभा खंडीत करतात.)**

**(अशोक बुरपल्ले)**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा खंडीत झाल्याची वेळ सायं. ७.०० वा.**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक -१७/१२//२०१४**

**सही/-**
**(श्री. संजय भाऊराव मोरे)**
**महापौर,**
**ठाणे महाागरपालिका, ठाणे.**

दि० १३-४-१५ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेत सदरचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

महापौर
ठाणे महा... ठाणे

साहेब, त्यावेळेस ते जर बिलो केले असते तर आपले ते पण पैसे वाचले असते. साहेब, तुम्ही आमच्या नगरसेवक निधीला, प्रभाग सुधारणा निधीला आणि मागासवर्गीय निधीला ५% बिलोचे हे लावले .. .. ..

**मा.आयुक्त सो. :-**

सन्मा. महापौर महोदय, सन्मा. सभागृह, आपल्यालाच पाच टक्के जास्त काम करता येईल ना?

**श्री. संतोष वडवले :-**

हो, करता येईल. आम्ही कुठे नाही म्हणतोय.

**श्री. अशोक वैती :-**

साहेब, बिलोची अमाऊंट कुठलाही कार्यकारी अभियंता कुणाला परत देत नाही. ते हुशार आहेत तेच परत घेतात. बाकी कुणालाही बिलोची अमाऊंट परत मिळत नाही. साहेब, जर २५% बिलो असेल तर उरित अमाऊंट पुन्हा त्या नगरसेवकाला मिळायला हवी. कुठलाही अधिकारी तो प्रस्ताव करत नाही. जो हुशार आहे तो करतो हरकत नाही.

**श्री. संतोष वडवले :-**

मा.महापौर महोदय, हया गोष्टीचा जर आपण गांर्भियाने विचार केला तर आपले उत्पन्न नक्कीच वाढेल. धन्यवाद. जयहिंद जय महाराष्ट्र.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, आताच शिवसेना गटनेते साहेबांनी बिलोबाबत सांगितले आणि त्याला सन्मा.अशोक वैती साहेबांनी दुजोरा दिलेला आहे. साहेब, मला वाटते याबाबतीत चर्चा होणे गरजेचे आहे. सगळयाच नगरसेवकांच्या प्रभागात बिलोची रक्कम वापरली गेली पाहिजे. आपल्याकडे तसे होत नाही म्हणून नगर अभियंता यांनी सर्व संबंधित कार्यकारी अभियंताना तशाप्रकारचे स्पष्ट आदेश दिले पाहिजेत.

**मा. सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, हया चर्चेशी संबंधित विषय नाही. परंतू तो नगरसेवकांच्या दृष्टीने फार महत्वाचा विषय आहे. साहेब, नगरसेवक निधीच्या सर्व वॉर्डाच्या निविदा निघालेल्या आहेत आणि आता प्रभाग सुधारणा निधीचे बजेट टाकायला आपण चालू केलेले आहे. परंतू नगरसेवक निधीच्या रेटप्रमाणे ऑलरेडी नगरसेवक निधीची टेंडर निघालेले आहे आणि प्रभाग सुधारणा निधी मार्चपर्यंत खर्च करायचा आहे. नगरसेवक निधीला ज्याप्रमाणे रेट कोट झालेला आहे त्याप्रमाणे प्रभाग सुधारणा निधीची कामे केली तर बरे होईल.

**मा.आयुक्त सो. :-**

फक्त याचेउत्तर देतो बाकीचे नंतर. आपल्याला असे करता येईल की, जे आपण ओरीजनल टेंडर काढले होते. त्याची जी अमाऊंट आहे तिथपर्यंत दोन्ही निधीचा खर्च करावा. आणि जे नविन टेंडर निघणार आहे त्याच्यानंतर हया अमाऊंटच्या नंतरचे पैसे खर्च करावेत. कारण आपल्याला कॉन्ट्रक्टची अमाऊंट जी आहे ती वाढविणे योग्य नाही.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

साहेब, आपण जेंव्हा प्रशासकिय वित्तीय मान्यता देतो ती त्या रक्कमेला देतो आणि टेंडर त्या रक्कमेपेक्षा कमी येते.

**मा.आयुक्त सा़ो. :-**

जी कॉन्ट्रक्ट अमाऊंट स्थायी समितीने मान्य केलेली आहे.. .. ..

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, प्रस्तावाप्रमाणे पाच-पाच लाखाच्या प्रभाग निहाय फाईल्स बनवाव्यात आणि त्याचे सात दिवसाचे टेंडर काढावे म्हणजे तो विषय संपून जाईल. मग टेंडरमध्ये निविदाप्रक्रिया अडकणार नाही. साहेब, मी प्रभाग सुधारणा निधीचे बोलतोय.

**मा.सभागृह नेते :-**

साहेब, नगरसेवक निधीप्रमाणे त्यांना करु दया.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

साहेब, त्याच्यामध्ये वेळ जाईल.

**मा.सभागृह नेते :-**

साहेब, नगरसेवक निधीचे टेंडर ऑलरेडी निघालेले आहे. नगरसेवक निधीप्रमाणे करु दया.

**मा.महापौर सा़ो. :-**

माझ्या माहितीप्रमाणे त्या टेंडरमध्ये आयटम रेट फायनल केलेले आहेत. मग आयटम रेटप्रमाणे तीच कामं होणार असतील तर काय हरकत आहे?

**सौ. आशा कांबळे :-**

मा.महापौर महोदय, मी जास्त वेळ बोलणार नाही. आताच शिवसेना गटनेते श्री. वडवले साहेबांनी नाल्याच्या स्थितीबाबत सांगितले त्यांचा नाला क्र. ५. माझ्या प्रभाग क्र. २९ मध्ये चार-पाच नाले उगम पावतात. त्यांचे नंबर मला मिळाले तर बरे होईल. कारण गेले पाच-सहा वर्ष मी बोलतेय. मला त्या नाल्याचे क्रमांक सांगा आणि तुमची जी काही यादी आहे त्यामध्ये ते नाले आहे की नाहीत ते सुध्दा सांगा.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

मा.महापौर महोदय, आता नगरसेवक निधीचे जे टेंडर काढलेले आहे. त्या टेंडरमध्ये बांधकाम खात्याशी संबधितच कामं घेतलेली आहेत. नगरसेवकांना त्यांच्या प्रभागात इतर जी कामं करायची आहेत. उ. बगीच्याचे सुशोभिकरण करायचे आहे. पाणी खात्याशी संबधित काम करायचे आहे तर त्या कामांसाठी परत टेंडर काढावी लागणार आहेत. मला एक कळत नाही ते आयटम का घेतले नाहीत. नगरसेवक निधीची टेंडर निघतात तेंव्हा नगरसेवक फक्त बांधकाम खात्याशी संबधित कामं करणार असं समजून नगर अभियंता कसे काय टेंडर काढतात? नगर अभियंता हा संपूर्ण शहराचा आणि सगळया खात्यांच्या असतो. त्याच्यात पाणी, बगीचा, विद्युत वगैरे हे सगळं येत. आयटम रेट घेताना सगळया आयटमचे रेट की घेतले

महापौर
महानगरपालिका ठाणे

नाही. मला आता माझ्या वॉर्डात जर काही काम करायचे असेल तर परत टेंडर मागविणार मग हया टेंडरचे काय होणार? म्हणजे डोक न वापरता त्यांनी ते टेंडर काढायचे बस. मा.आयुक्तांनी टेंडर काढायला सांगितले आहे टेंडर काढायचे. अशी जर इंजिनिअर्स लोकांची मानसिकता असेल तर आमची कामं होणारच नाहीत.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, ठरावांच्या बाबतीत सुध्दा असेच म्हणणे आहे.

**मा.सभागृह नेते :-**

मा.आयुक्त साहेब, हयामध्ये आपला खर्च वाचणार आहे.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

साहेब, हयासाठी तुम्ही स्पेसिफीक सूचना दिल्या पाहिजेत की, जर अशी कामं आली तर त्या त्या डिपार्टमेंटचे जे रेट आहेत त्यानुसार ती कामं करा. परत टेंडर काढा मग मार्च येणार आमचा निधी लॅप्स होणार.

**मा.आयुक्त सो. :-**

सन्मा.महापौर, मा.सन्मा. सभागृह. आपण जितक्या अमाऊंटचे टेंडर काढले होते. त्याच्यामध्ये दोन गोष्टी होत्या. त्याच्यामध्ये आयटम दिलेले होते आणि टोटल अमाऊंट लिहिली होती की, इतक्या रुपयांपर्यंतचा कॉन्ट्रक्ट देता येईल. आपण जी अमाऊंट दिली होती त्या अमाऊंटमध्ये बदल करता येणार नाही. ठेकेदाराच्या अमाऊंटमध्ये आपल्याला बदल करता येणार नाही. पण प्रॅक्टीकली एक काम करता येईल की, जे काही आयटम त्याच्यामध्ये आहेत. जर तेच काम प्रभाग निधी किंवा दुस-या कोणत्या फंडातून करत असताना तेच जर आयटम असतील तर त्या ठेकेदाराला जी काही टोटल अमाऊंट दिलेली आहे. त्याच्या अंतर्गत आपल्याला हे काम देता येईल आणि याला एखाद महिना लागेल तो पर्यंत जे आयटम टेंडरमध्ये नाहीत त्यांचा आणिउरलेल्या निधीचा एकत्रित टेंडर काढायचे म्हणजे काम थांबणार नाही.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

साहेब, तुम्ही आता म्हणताय ते म्हणणं फार सोप आहे. परंतू तसं ॲक्चूली ठरावित मुदतीत होत नाही. ते टेंडर निघायला फेब्रुवारी शेवटउजाडला तर मग आमची कामं होणार कशी?

**मा.आयुक्त सो. :-**

टेंडरची प्रक्रिया ऑलरेडी सुरु झालेली आहे ती चालू राहू दया. तेव्हा माझ्याकडे नोट ठेवतील. त्या नोटमध्ये जर नगरसेवक निधी लिहिला असेल तरी आयटम तेच असल्यामुळे आणि कॉन्ट्रक्ट टोटल अमाऊंटच्या आत असल्यामुळे त्यांना दुस-या निधीचे पैसे याच ठेकेदाराकडून त्या आयटम रेटने करण्यासाठी माझ्याकडून परवानगी मागतील. मी हो म्हणता आणि माहितीसाठी स्थायी समितीकडे पाठवून देतो. आणि बाकीचे टेंडर जे निघत आहेत त्याच्यामध्ये एखादा आयटम पूर्वी राहून गेला असेल. ते आयटम ॲड करा आणि त्याचा आयटम रेट काढावा.

.. ..

महापौर

**श्री. मिलींद पाटणकर :-**

मा. आयुक्त साहेब, काही काही खात्याचे आयटम घेतलेलेच नाहीत.उदा. गार्डन विभागाचे आयटम घेतलेले नाहीत. विद्युत विभागाचे आयटमच घेतलेले नाहीत.

**मा.आयुक्त सो. :-**

जर आयटम नसतील तर आपल्याला आयटम रेट टेंडर काढावे लागेल.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

साहेब, ते केंव्हा काढणार? मी आधी लक्षवेधीवर बोललो तेंव्हा पण हेच म्हटले की, जो काही आपला स्टाफ आहे, जे काही आपले अधिकारी आहेत. ते कुठल्याही प्रकारचा विचार न करता ठरावित साच्यातून निघाल्यासारखे काम करतात. याबाबत कुठेतरी त्यांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे आणि ती मानसिकता त्यांचे माईंड ॲप्लाय केलं तरच बदलणार आहे नाहीतर नाही. हा विचार त्यांनी आधी पण करायला पाहिजे होता की, हे आयटम आपण घेतले नाही तर काय होईल?

**मा.आयुक्त सो. :-**

सन्मा. महापौर, सन्मा. सभागृह, आम्ही त्यांना आदेश दिले होते नगरसेवक निधीमधून सरासरी जी काही कामं होतात. त्याचे आयटम घेऊन तुम्ही टेंडर काढावे. त्यामध्ये गार्डन विभागाचे काम यापूर्वी कधी नगरसेवक निधीतून झाले नसावे म्हणून त्यांनी ते आयटम आता टाकले नसावे.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

आयुक्त साहेब, अशी कामे यापूर्वी नगरसेवक निधीतून झालेली आहेत.

**मा.आयुक्त सो. :-**

पण नगरसेवक निधीतून आयटम रेट काढताना सर्व कामं कधीही कोणतेही नगरसेवक किंवा नगरसेविका मागू शकतात. त्याचे आयटम येणे अपेक्षित होते. त्यापैकी समजा गार्डन विभागाचे, विद्युत विभागाचे आयटम आले नसतील तर आता त्यांनी पूर्ण आयटम टाकून, ॲक्चूली जनरली आपण आयटम रेटमध्ये काय करतो पूर्णच्या पूर्ण डीएसआचे सगळे आयटम टाकतो.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

साहेब, यापुढे सगळया अधिका-यांनी त्यांची काम करण्याची पध्दतच बदलली पाहिजे. या सगळया अधिका-यांसाठीच मी बोलतोय की, त्यांची मानसिकता बदलली पाहिजे.

**श्री. बालाजी काकडे :-**

मा.महापौर महोदय, सन्मा. जेष्ठ सदस्यांनी उचललेला मुद्दा रास्त आहे. त्यांनी सगळं टेंडर एकत्रित काढले आहे. आम्हाला नगरसेवक निधीतून वेगवेगळी कामे सुचवायची असतात. पण टेंडरमध्ये फक्त बांधकाम खात्याचे आयटम घेतले आहेत. आम्हाला एखादं काम अर्जंट असेलउदा. शौचालय चोकअप झाले असेल, एखादी पाण्याची लाईन फुटली असेल तर काय? तुम्ही एकत्रित टेंडर काढले आहे. त्यामुळे तुम्ही संबधित इंजिनिअरला सूचना दया नगरसेवक सुचवेल त्याप्रमाणे प्रभागात जे काम असेलउदा. अर्जंट एखादी पाण्याची लाईन टाकायची असेल, एखादया ठिकाणी शौचालय चोकअप झाले असेल, आणि

अध्यक्ष
ठाणे महानगरपालिका ठाणे.

नगरसेवकांनी सुचविले तर तशाप्रकारचा प्रस्ताव करुन त्या टेंडरमधून ते काम करुन दयावे अशा सूचना दया.

**श्री. मनोज शिंदे :-**

पाटणकर साहेब, तुम्ही प्रशासनाची बाजू घेताय हे बरोबर नाही.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, मी हा विषय याच्यासाठी काढला होता की, नगरसेवकांची कामे व्हावीत. नगरसेवकांच्या कामांचा अंर्तभाव होण्यासाठी आम्ही हा विषय काढला होता. तर त्याच्यावर चर्चा करावी. प्रशासनाची बाजू कशाला घेता.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

मा.महापौर महोदय, मराठी भाषेमुळे हे असे झाले आहे. हयांना नक्की कळत नाही मी कोणाची बाजू घेतोय.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, आता सन्मा. नजीब मुल्ला आणि मिलींद पाटणकर साहेबांनी जो मुद्दा मांडला त्याबाबत माझे असे म्हणणे होते की, आता प्रभाग विकास निधी आणि नगरसेवक निधीचा विषय चालला होता. आता प्रत्येक प्रभागामध्ये काय गरज आहे, कुठले विभाग आहेत, काम कसे झाले पाहिजे, त्या ठिकाणीच्या नागरिकांची गरज आणि नागरिकांच्या गरजेनुसार त्या-त्या प्रभागाचे नगरसेवक आपली भुमिका मांडत असतात. इथे मात्र फक्त मोजकेच रेट घेतात आणि आम्हाला कामाला लावतात आणि आम्हाला प्रत्येक फाईल फिरवावी लागते. .. ..

**श्री. बालाजी काकडे :-**

मा. महापौर महोदय, आम्ही जी सूचना मांडली ती सूचना ते परत मांडत आहेत. मा.महापौर महोदय, तुम्ही रुलिंग दया.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

मा.महापौर साहेब, आम्ही जे बोललो ते ते बोलत आहेत.

**मा.आयुक्त सो. :-**

सन्मा.महापौर , सन्मा.सभागृह, आपण नगरसेवक निधीसाठी ऑलरेडी टेंडर काढून ठेवले आहे. त्या टेंडरमध्ये एकतर टोटल आमाऊंट दिलेली आहे. त्या अमाऊंटपर्यंत काम करता येते. आणि त्याच्यामध्ये काही डीएसआरचे आयटम दिलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे की, एखादया डीएसआरचे जसे की, विद्युतचे, गार्डनचे काही डीएसआरचे काही आयटम नसण्याची शक्यता आहे. आणि त्याच्यामध्ये तिसरे बंधन असे होते की, तुम्ही नगरसेवक निधीमधून पैसे खर्च करणार. आता नगरसेवक निधीचे असेल तर प्रभाग निधीचे पैसे पण आपण त्याच ठेकेदाराकडून करुन घेऊ शकतो. फक्त त्यांची टोटल अमाऊंट जी आहे ती टोटल अमाऊंट त्यांच्या कॉन्ट्रक्टपर्यंत ठेवावी लागेल. पुढच्या पंधरा-वीस दिवसापर्यंत हा कॉन्ट्रक्ट तुम्ही सगळया निधीसाठी वापरा. त्या आयटमसाठी जे आयटम त्याच्यामध्ये आहेत त्या आयटमसाठी

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

सगळया निधीसाठी वापरा. एक महिन्यामध्ये आपण बाकीचे जे आयटम आहेत ते करु. आणि बाकीचा जो निधी आहे त्याची टोटल अमाऊंट करुन त्याचे टेंडर फायनल करुन घेऊ.

**मा.सभागृह नेते :-**

कॅफो साहेब, तुम्ही ऐकले ना? नाहीतर फाईल्स परत पाठवाल कारण आता तीनच महिने राहिले आहेत.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

साहेब, एका महिन्यात हया सगळया आयटमचे टेंडर फायनल होतील .. ..

**मा.आयुक्त सो. :-**

कारण त्याच्यामध्ये डीएसआरचे आयटम ठेवायचे आहेत. कॉन्टीटीबद्दल म्हणू शकत नाही. फक्त आयटम ठेवायचे आहेत.

**श्री. हरिश्चंद्र पाटील :-**

मा.महापौर महोदय, हयाच्यामध्ये सर्व आयटमचा समावेश झाला पाहिजे अशाप्रकारचे तुम्ही प्रशासनाला निर्देष दया. तुमच्या रुलिंगमध्ये ते आले पाहिजे.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, नगरसेवकांच्या प्रस्तावाप्रमाणे असा त्यामध्ये उल्लेख व्हावा असे लेखी आदेश व्हावेत.

**मा.महापौर सो. :-**

सन्मा.सदस्य, श्री. मिलींद पाटणकर हयांनी जी सुचना केली आहे ती योग्य आहे. प्रशासनाने ज्यावेळी टेंडर काढले त्यावेळेस आयटम रेट आणि त्यामध्ये सर्व डिपार्टमेंटचा डिएसआर रेट असतो त्याप्रमाणे त्यांनी करायला पाहिजे होते. आणि त्यात नमूद करायला पाहिजे होते की, उपलब्ध निधीनुसार आणि स्पेसिपीक नगरसेवक निधी आणि प्रभाग सुधारणा निधी आणि मागासवर्गीय निधी यांचा समावेश करुन घेतला असता आणि ती अमाऊंट फायनल करुन त्या अमाऊंटप्रमाणे केले असते तर अशी अडचण आली नसती. मी प्रशासनाला आदेश देतो की, ही जी काही प्रक्रिया आहे ती फक्त चौदा दिवसांची असावी.

**श्री. हरिश्चंद्र पाटील :-**

मा.महापौर महोदय, चौदा दिवसांची गरज काय आहे. आपल्याला मार्च आगोदर ती निधी वापरायची आहे.

**श्री. मिलींद पाटणकर :-**

पाटील साहेब, ते चौदा दिवस आयटमसाठी आहेत.

**मा.महापौर सो. :-**

ठिक आहे, माजी महापौरांच्या म्हणण्यानुसार सात दिवसांची करावी. असे मी प्रशासनालाआदेश देतो.

महापौर

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, आता सात वाजले आहेत. पुढच्या चर्चेसाठी ही लक्षवेधी राखून ठेवावी अशी विनंती आहे.

**श्री. मनोज शिंदे :-**

मा.महापौर महोदय, मला लक्षवेधीवर चर्चा करायची आहे.

**(तद्नंतर मा. महापौर महोदय, सायंकाळी ७.०० वाजता सभा खंडीत करतात.)**

**सभा खंडीत झाल्याची वेळ सायं. ७.०० वा.**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक -१७/१२//२०१४**

**(अशोक बुरपल्ले)**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सही/-**
**(श्री. संजय भाऊराव मोरे)**
**महापौर,**
**ठाणे महाागरपालिका, ठाणे.**

दि० १३-१-१५ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेत सदरचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

**महापौर**
**ठाणे म... ठाणे**